




# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com








* वर्ष ६४ वे * अंक १५९ * नांदेड * रविवार, दि. १५ जून २०२५ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎ : 255777, Fax :252211


## युद्ध पेटले! इराणने इस्रायलवर १०० बॅलेस्टिक क्षेपणास्त्र डागली



**इराण (वृत्तसंस्था)–** इस्रायलने शुक्रवारी पहाटे इराणवर हवाई हल्ला केल्यानंतर रात्री इराणनेही इस्रायलला चोख प्रत्युत्तर दिलं. इराणने इस्रायलमधील जेरुसलेम व तेल अवीवसह अनेक प्रमुख शहरांवर शेकडो क्षेपणास्त्रे डागली. तर, इस्रायलनेही इराणविरोधात 'ऑपरेशन रायझिंग लायन' ही मोहीम सुरू केली असून त्याअंतर्गत इराणवर हल्ले केले जात आहेत. इराणने इस्त्रायलवर जवळपास १०० बॅलेस्टिक क्षेपणास्त्र डागली.

शुक्रवारी पहाटने इस्रायली हवाई दलाने तेहरानमधील इराणच्या अनेक लष्करी तळांना व इराणमधील आण्विक तळांना लक्ष्य केलं. त्यानंतर इस्रायलचे पंतप्रधान बिन्यामिन नेतान्याहू यांनी 'ऑपरेशन रायझिंग लायन' सुरू झालं असल्याची घोषणा केली. पाठोपाठ इस्रायली हल्ल्यात इराणच्या लष्करातील अनेक मोठे अधिकारी व अणूशास्त्रज्ञ ठार झाल्याचं वृत्त समोर आलं. त्यानंतर शुक्रवारी मध्यरात्री इराणने इस्रायलमधील अनेक शहरांवर १०० हून अधिक क्षेपणास्त्र डागली. दोन्ही देशांनी एकमेकांविरोधात मोहिमा उघडल्यामुळे मध्य पूर्वेत तणाव निर्माण झाला आहे.

या हल्ल्यामध्ये इराणने इस्रायलचं अणुसंशोधन केंद्र उद्धवस्त केल्याचा दावा केला आहे. इस्रायलमधील जेरूसलेम शहरावरही इराणने ड्रोन हल्ले केले. मात्र इराणचे ड्रोन पाडल्याचा दावा इस्रायली डिफेन्स फोर्सेसने केला आहे. या हल्ल्यानंतर इस्रायलच्या शहरांची मोठी हानी झाल्याची माहिती आहे. जीवितहानीही झाली असल्याची शक्यता आहे.

## आधारकार्ड निःशुल्क अपडेट करण्यास मुदतवाढ

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरणाने (यूआयडीएआय) आधार कार्ड मोफत अपडेट करण्याची अंतिम मुदत पुन्हा एकदा वाढवली आहे. यापूर्वी ही मुदत १४ जून २०२५ पर्यंत होती. आता ती १४ जून २०२६ पर्यंत वाढवण्यात आली आहे. यूआयडीएआयने आपल्या अधिकृत ट्विटर (एक्स) हॅन्डलवर याबाबत माहिती दिली आहे.

या निर्णयामुळे ज्या नागरिकांनी अद्याप आपले आधार कार्ड अपडेट केलेले नाही, त्यांना आणखी एक वर्षाचा कालावधी मिळाला आहे. विशेषतः ज्या व्यक्तींचे आधार कार्ड १० वर्षे किंवा त्याहून अधिक जुने आहे, त्यांनी एकदाही ते अपडेट केलेले नाही, त्यांच्यासाठी हे अपडेट करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. सरकारने स्पष्ट केले आहे की अशा व्यक्तींनी ओळखपत्र आणि पत्त्याचा पुरावा सादर करून आपले आधार तपशील अद्ययावत करणे अनिवार्य आहे. असे न केल्यास त्यांचे आधार कार्ड रद्द होण्याची शक्यता आहे.

आधार अपडेट करण्यासाठी नागरिकांना दोन प्रकारच्या कागदपत्रांची आवश्यकता असेल – एक ओळखीचा पुरावा (उदा. पॅन कार्ड) आणि दुसरा पत्त्याचा पुरावा (उदा. मतदार ओळखपत्र). साधारणपणे आधार केंद्रांवर या प्रक्रियेसाठी ५० रुपये शुल्क आकारले जाते.

## नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने भरपाई देण्यासाठी प्रयत्न करणार –पालकमंत्री अतुल सावे

### पालकमंत्र्यांनी केली अर्धापूर तालुक्यातील नुकसानग्रस्त भागाची पाहणी



**नांदेड (प्रतिनिधी)–** मागील काही दिवसांपासून नांदेड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात पाऊस, वादळी वारा सुरु आहे. यामुळे जिल्ह्यात विविध ठिकाणी नुकसान झाले आहे. अर्धापूर शिवारात केळी, पपई फळबाग असलेल्या शेतकऱ्यांच्या पिकांचेही मोठ्या प्रमणात नुकसान झाले आहे. याची पाहणी नांदेडचे पालकमंत्री अतुल सावे यांनी शनिवारी केली. नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या शेती पिकांचा अहवाल शासनास त्वरीत सादर केला जाईल. जिल्ह्यातील नुकसानग्रस्त बाधित शेतकऱ्यांना तातडीने भरपाई मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील अशी ग्वाही राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास व अपारंपारिक ऊर्जा, दिव्यांग कल्याण मंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांनी दिली.

शनिवारी अर्धापूर तालुक्यातील चिंचबन, अर्धापूर शिवार, लहान शिवारात नुकसान झालेल्या केळी व पिकांची पाहणी त्यांनी केली यावेळी ते बोलत होते. या पाहणी दौऱ्यात त्यांच्यासोबत खासदार अशोक चव्हाण, आमदार श्रीजया चव्हाण, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार, उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत आदींची उपस्थिती होती.

यापूर्वी पालकमंत्री अतुल सावे यांनी नुकसानग्रस्त झालेल्या पिकाचे पंचनामे तात्काळ करुन अहवाल शासनास सादर करण्याचे निर्देश जिल्हा प्रशासनास दिले होते. त्यानुसार येत्या मंत्रीमंडळ बैठकीत नुकसानीचा अहवाल सादर करुन नुकसाग्रस्तशेतकऱ्यांनालवकरभरपाई मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले. अर्धापूर तालुक्यातील चिंचबन येथील शेतकरी ज्ञानेश्वर शेट्टे, अर्धापूर शिवारातील व्यंकटराव साखरे, लहान शिवारातील गिरीश कल्याणकर व विठ्ठल इंगळे यांच्या शेतात जाऊन केळी व पपई या पिकांच्या नुकसानीची पाहणी त्यांनी केली. यावेळी त्यांनी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांशी संवाद साधून शेतकऱ्यांना योग्य ती मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

पालकमंत्री अतुल सावे यांनी शनिवारी नांदेड शासकीय विश्राम गृह येथे जिल्ह्यात अतिवृष्टी व वादळामुळे नुकसान झालेल्या केळी व पपई या फळ पिकांचा तसेच सर्व नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने नुकसान भरपाई देण्यासाठी जिल्हा प्रशासनाने त्वरीत अहवाल तयार करुन शासनाला सादर करावा, असे निर्देश त्यांनी दिले. यावेळी त्यांनी जिल्ह्यातील सर्व संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांशी विविध विषयांवर चर्चा करुन उपयुक्त सूचना दिल्या.

जिल्ह्यातील केळी या पिकाच्या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना योग्य ती विशेष बाब म्हणून मदत मिळवून देण्याची मागणी पालकमंत्री अतुल सावे यांच्याकडे खासदार अशोक चव्हाण यांनी यावेळी केली. यासह जिल्ह्यातील विविध प्रश्नांवर त्यांनी चर्चा केली.

या बैठकीस खासदार अशोक चव्हाण, आमदार डॉ. तुषार राठोड, आमदार श्रीजया चव्हाण, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार, निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर, उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत तसेच विविध विभागाचे अधिकारी आदींची उपस्थिती होती.

## अहमदाबाद विमान अपघातातील मृतांचा आकडा २७४ वर पोहोचला



**अहमदाबाद (प्रतिनिधी)–** अहमदाबादमध्ये एअर इंडियाचे विमान कोसळून झालेल्या दुर्घटनेतील मृतांची संख्या २७४ पर्यंत वाढली आहे. विमान कोसळून जमिनीवर जखमी झालेल्या आणखी काही जणांचा मृत्यू झाल्याची माहिती डॉक्टरांनी दिली आहे. अहमदाबादमध्ये झालेल्या विमान दुर्घटनेत २४१ प्रवाशांचा मृत्यू झाला होता. तसेच ज्याठिकाणी विमान कोसळले तिथे स्फोट होऊन काहींचा मृत्यू झाला होता. ही संख्या आता ३३ वर पोहोचल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे एकूण मृतांचा आकडा २७४ वर पोहोचला आहे.

लंडनच्या गेटवीक विमानतळाकडे झेपावलेले विमान फ्लाइट एआय १७१ हे गुरूवारी उड्डाण केल्याच्या अवघ्या काही सेकंदामध्येच अहमदाबादच्या बीजे मेडिकल हॉस्टेल आणि कॅन्टीनच्या इमारतीवर कोसळलं होतं.

## आषाढीसाठी पंढरीच्या वारीत येणाऱ्या ११०९ दिंड्यांना प्रत्येकी २० हजार रूपये

**मुंबई (प्रतिनिधी)–** आषाढी वारीमध्ये सहभागी होणाऱ्या वारकऱ्यांसाठी राज्य सरकारने निर्णय घेतला आहे. आषाढी वारीनिमित्त मानाच्या १० पालख्यांसोबत येणाऱ्या ११०९ दिंड्यांना प्रति दिंडी २० हजार रुपये अनुदान देण्यास प्रशासकीय मंजुरी देण्यात आली आहे. या निर्णयाचा शासन निर्णय देखील राज्य सरकारने जारी केला आहे.

मागील वर्षी (२०२४) तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या बैठकीत तिर्थक्षेत्र पंढरपूर येथील आषाढी एकादशी यात्रा सन २०२४ करिता मानाच्या १० पालख्यांसोबत येणाऱ्या प्रत्येक दिंडीला २० हजार रूपये इतके अनुदान सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत देण्याबाबत निदेश दिले होते. सन २०२३–२४ मध्ये विभागीय आयुक्त यांच्याकडून शासनाला एकूण ११०९ दिंड्यांची यादी प्राप्त झाली होती.

त्यानुसार गतवर्षीप्रमाणे यंदा देखील तिर्थक्षेत्र पंढरपूर येथील आषाढी एकादशी यात्रेसाठी मानाच्या १० पालख्यांसोबतच्या ११०९ दिंड्यांना प्रती दिंडी २० हजार रुपये याप्रमाणे एकूण २ कोटी २१ लाख ८० हजार रुपये इतके अनुदान वितरीत करण्यास शासन मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार मानाच्या १० पालख्यांसोबतच्या ११०९ दिंड्यांना प्रती दिंडी २० हजार रुपये अनुदान वितरीत करण्यात येणार आहे.

दरम्यान, पंढरपूरच्या दिशेने निघालेल्या लाखो वारकऱ्यांसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षातर्फे 'चरणसेवा' हा उपक्रम राबविण्यात येत आहे. राज्यातील नाशिक, जालना, सातारा, सोलापूर आणि पुणे या पाच जिल्ह्यांतून निघणाऱ्या पालख्यांमध्ये सहभागी होणाऱ्या वारकऱ्यांची आरोग्य तपासणी, उपचार आणि 'चरणसेवा' करण्यासाठी सुमारे पाच हजार वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत.

## कंधार तालुक्यात ९ लाख रुपयांचा गांजा पकडला; स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई



**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यातील कंधार तालुक्यात धर्मापुरी तांडा शिवारात गांजाची विक्री होत असल्याची माहिती स्थानिक गुन्हा शाखेला मिळाल्यानंतर तेथे कारवाई करून तब्बल ९ लाख १३ हजार रुपयांचा गांजा आणि एक ५ लाखांचे चार चाकी वाहन जप्त करण्यात आले आहे. ही कारवाई दि. १३ जून रोजी करण्यात आली. या प्रकरणात दोघांविरुद्ध लोहा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नांदेड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात गुटखा, गांजाची विक्री आणि वाहतूक होत असल्याची बाब पुढे येत आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी जिल्ह्यातील अंमली पदार्थ विक्री आणि वाहतूक करणाऱ्या इसमाविरुद्ध कारवाई करण्यासाठी विशेष मोहीम सुरू केली आहे. अंमली पदार्थांची विक्री आणि वाहतूक करणाऱ्या इसमांची माहिती काढून त्यांच्यावर कारवाई करण्याबाबत पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी जिल्ह्यातील पोलीस निरीक्षकांना आदेशित केले आहे.

स्थानिक गुन्हा शाखेनेही अशा अंमली पदार्थ विक्री आणि वाहतूक करणाऱ्या करणाऱ्यांना जेरबंद करण्यासाठी वेगवेगळी पथके तयार करून रवाना केले आहे. दरम्यान १३ जून रोजी स्थानिक गुन्हा शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांनी आपल्या पथकास कंधार तालुक्यात गस्तीवर पाठवले. धर्मापुरी तांडा येथे काही इसम गांजाची विक्री वाहतूक करत असल्याची गुप्त माहिती पथकाला मिळाली. या माहिती आधारित स्थानिक गुन्हा शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक रवी वाहुळे यांनी तहसीलदार नंदकिशोर भोसीकर तसेच लोहा पोलीस ठाण्यातील आवश्यक पोलीस बंदोबस्त मनुष्यबळ घेऊन धर्मापुरी तांडा शिवारात छापा टाकला. त्यावेळी एका चार चाकी वाहनांमध्ये गांजाचे १८ मोठे कट्टे आढळले. हा सर्व मुद्देमाल चोरट्यांनी पोलिसांनी ताब्यात घेतला आणि पंचनामा केला.

ही कारवाई सहायक पोलीस निरीक्षक रवि वाहुळे, पोलीस उपनिरीक्षक बळीराम दासरे, महिला पोलीस उपनिरीक्षक के. सी. बेंबडे, सहायक पोलीस उपनिरीक्षक गुंडेराव करले, अंमलदार विठ्ठल शेळके, देविदास चव्हाण, मोतीराम पवार, सिद्धार्थ सोनसळे यांच्या पथकाने केली.

या गांजाचे एकूण वजन १८२ किलो ७०० ग्रॅम होते. त्याची एकूण किंमत ९ लाख १३ हजार ५०० रुपये इतकी आहे. त्याचवेळी चारचाकी वाहन ५ लाखांचे आहे. या कारवाईत पोलिसांनी १४ लाख १३ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी लोहा पोलिस ठाण्यात माधव विठ्ठल जाधव (वय ३९) रा. धर्मापुरी तांडा मजरे आणि अशोक मरीबा वाघमारे (वय ३०) रा. भुशी रोड ता. कंधार या दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या कारवाईचे पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी कौतुक केले.

## डब्ल्यूटीसी फायनल : ऑस्ट्रेलियाला पराभूत करत द.आफ्रिकेने २७ वर्षांनी पटकावले आयसीसी विजेतेपद

**लंडन (वृत्तसंस्था)–** डब्ल्यूटीसी फायनल्स अर्थातच वर्ल्ड टेस्ट चॅम्पियशीपच्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेने ऑस्ट्रेलियावर ५ गडी राखून मात केली. या विजयासह आफ्रिकन संघाने आपल्यावरील 'चोकर्स' हा शिक्का अखेर पूसून टाकला आहे. कगिसो रबाडा, एडेन मार्करम आणि कर्णधार टेम्बा बावुमा हे दक्षिण आफ्रिकेच्या विजयाचे शिल्पकार ठरले.

ऑस्ट्रेलियाने दक्षिण आफ्रिकेसमोर विजयासाठी २८२ धावांचं आव्हान ठेवलं होतं. या लक्ष्याचा पाठलाग करताना एडेन मार्करम आणि टेम्बा बावुमाने १५० हून अधिक धावांची भागिदारी रचत आफ्रिन संघाच्या विजयाचा पाया रचला. मार्करने १३६ तर कर्णधार बावुमाने ६६ धावांची खेळी करत आपल्या संघाला विजय साकारुन दिला. तर या सामन्यात एकूण ९ गडी बाद करणारा कगिसो रबाडा खऱ्या अर्थाने या संघांच्या विजयाचा हिरो ठरला. या सामन्यात शतक झळकावणारा मार्करम सामनावीराचा मानकरी ठरला.

१९९८ मध्ये वेस्ट इंडिजला पराभूत करत दक्षिण आफ्रिकेने आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफीचं विजेतेपद पटकावलं होतं. त्यानंतर त्यांना तबब्ल २७ वर्षांपासून एकदाही आयसीसीची ट्रॉफी जिंकता आलेली नव्हती. आययसीसीच्या अनेक स्पर्धांमध्ये कायमच मोक्याच्या क्षणी कच खाणारा संघ अशीच त्यांची क्रिकेट विश्वात ओळख होती. अखेर दक्षिण आफ्रिकेच्या संघाला टेम्बा बावुमाच्या नेतृत्वाखाली आपल्यावरी चोकर्सचा शिक्का पुसण्यात २७ वर्षांनी यश मिळालं आहे.

## नीट युजी परीक्षेत महाराष्ट्रातून कृषांग जोशी पहिला, राजस्थानचा महेश कुमार देशात प्रथम

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** राष्ट्रीय चाचणी संस्थेने (एनटीए) शनिवारी नीट युजी २०२५ चा निकाल जाहीर केला. राजस्थान मधील हनुमानगड येथील महेश केसवानीने अव्वल स्थान पटकावले आहे. त्याला ७२० पैकी ६८६ गुण मिळाले आहेत. महाराष्ट्रातून कृषांग जोशीने प्रथम येण्याचा मान मिळवला आहे. आरव अग्रवाल सुद्धा पहिल्या दहामध्ये स्थान मिळवण्यात यशस्वी झाला आहे. इंदोर मधील उत्कर्ष अवधिया दुसऱ्या क्रमांकावर आहे. पहिल्या १० मध्ये राजस्थानमधील ४ विद्यार्थ्यांचा समावेश आहे. त्यापैकी ३ विद्यार्थी कोटाचे आहेत.

भारतात एमबीबीएस अभ्यासक्रमासाठी एकूण ११८१९० जागा आहेत. २०२४–२५ या शैक्षणिक सत्रात, यापैकी ११५२५० जागा भरल्या गेल्या. वैद्यकीय समुपदेशन समिती (एमसीसी) १५ टक्के अखिल भारतीय कोट्याखाली एमबीबीएस आणि बीडीएस जागांसाठी एनईईटी यूजी २०२५ द्वारे समुपदेशन प्रक्रिया आयोजित करते. नीट युजी स्कोअरच्या आधारे, वैद्यकीय समुपदेशन समिती (एमसीसी) एमबीबीएस, बीडीएस आणि इतर वैद्यकीय युजी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी नीट युजी समुपदेशन २०२५ आयोजित करेल. या अंतर्गत, एमसीसी १५ टक्के अखिल भारतीय कोटा (एआयक्यू) साठी समुपदेशन करेल. तर ८५ टक्के जागा राज्य समुपदेशनाद्वारे भरल्या जातील.

## विविध आघाड्यावरती देशाचा विकास गतीने पुढे –खा. अशोकराव चव्हाण

### पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ११ वर्ष कारकिर्दीच्या पुस्तिकेचे प्रकाशन



**नांदेड (प्रतिनिधी)–** देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या यशस्वी कारकिर्दीला नुकतीच ११ वर्ष पूर्ण झाली. हा कालखंड देशाच्या सर्वांगीण आणि दूरगामी विकासाला गती देणारा ठरला असून २०४७ पर्यंत विकसित भारत घडविण्याचा प्रयत्न व संकल्प पंतप्रधान मोदी यांनी केला असल्याचे मत माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण पत्रकार परिषदेत व्यक्त केले. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ११ वर्ष कारकिर्दीच्या पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले.

या पत्रकार परिषदेला पालकमंत्री अतुल सावे, भाजपचे जिल्हाध्यक्ष ॲड. किशोर देशमुख, डॉ. संतुक हंबर्डे, महानगर अध्यक्ष अमरनाथ राजूरकर, आमदार श्रीजया चव्हाण, आमदार डॉ. तुषार राठोड, आ. राजेश पवार, कार्यकारणी सदस्य चैतन्यबापू देशमुख आणि माजी महानगराध्यक्ष प्रवीण साले यांची उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलताना खासदार अशोकराव चव्हाण म्हणाले, पंतप्रधान मोदी यांनी 'सब का साथ, सब का विकास, सब का विश्वास, सब का प्रयास'चा मुलमंत्र स्वीकारला आहे. त्यांनी सर्वसामान्य माणसाला केंद्रबिंदू मानून कारभार केला. ११ वर्षांची ही कारकिर्द 'संकल्प से सिद्धी तक' अशीच राहिली आहे. नरेंद्र मोदी यांनी २०४७ पर्यंत विकसित भारत घडविण्याचा संकल्प केला आहे. विकसित भारताच्या प्रवासात देशातील सर्व क्षेत्रे आणि सर्व समाजघटकांचाही विकास व्हावा, यासाठी त्यांनी अनेक आघाड्यांवर क्रांतिकारी, परिवर्तनकारी निर्णय घेतले. या ११ वर्षांत विकसित भारताची पायाभरणी झाली. अनेक क्षेत्रात देश आत्मनिर्भर होण्याच्या वाटेवर अग्रेसर झाला. हा कालखंड विकासाचा अमृतकाळ ठरला. या कार्यकाळात त्यांनी सर्वसमावेशक राज्यकारभार आणि लोककेंद्रित विकासाला प्राधान्य दिले. ही कारकिर्द गरीबांच्या कल्याणासाठी, सर्वसामान्यांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडवणारी आणि भारताच्या सर्वांगीण विकासाला चालना देणारी ठरली आहे, असे त्यांनी सांगितले.

याचबरोबर शेती क्षेत्रात मोठे परिवर्तन झाले. प्रमुख पिकांच्या किमान आधारभूत किंमतीत दुप्पट वाढ झाली. आयुष्मान भारत योजनेंतर्गत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना या जगातील सर्वात मोठी सरकारी आरोग्य विमा योजनेत १०.७४ कोटी कुटुंबांना प्रति कुटुंब प्रति वर्ष ५ लाख रुपयांचे आरोग्य कवच प्रदान करण्यात आले. कोवीड–१९ लसीकरणात भारताने जागतिक स्तरावर आघाडी घेतली. २२० कोटींहून अधिक डोस देण्यात आले, ज्यामुळे महामारीवर नियंत्रण मिळाले. सर्वांना घरे उपलब्ध करून देण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजना सुरु झाली, प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेंतर्गत १०.३३ कोटींहून अधिक गरीब कुटुंबांना मोफत एलपीजी गॅस कनेक्शन देण्यात आले. स्वच्छ भारत अभियानात देशभरात ११.८४ कोटी शौचालयांचे बांधकाम आणि कचरा व्यवस्थापनाला गती मिळाली, यासह अनेक कामांबद्दल यावेळी खा. चव्हाण यांनी माहिती दिली.

या पत्रकार परिषदेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ११ वर्ष कारकिर्दीच्या पुस्तिकेचे प्रकाशन पालकमंत्री अतुल सावे, खा. अशोकराव चव्हाण, जिल्हाध्यक्ष ॲड. किशोर देशमुख, डॉ. संतुक हंबर्डे, महानगर अध्यक्ष अमरनाथ राजूरकर, माजी महानगर अध्यक्ष प्रविण साले यांच्या हस्ते करण्यात आले.

# भूक

वऱ्हाडी कथा

भूक हे पोटासंग आयुक्शभर जोडलेली डाकीन हायं. भूक हे कोनालेचं सोळत नाह्यी. मंग थो मानूस असो, किळीमुंगी असो, चिटपाखरू असो, झाळ-येल असो, जनावर असो वा कोनीही. जे जिता थ्याले भूक लागतेचं लागते.

चला त दोस्तहो तुमच्यासाठी घेवूनं येतो एक कथा 'भूक'

आटपाट नगर होतं. नगराचं नावं होतं हिरपूर. आकोला जिल्यातल ऊमरातीच्या काठावरलं एक टुमदार गांव. ह्या गावातल्या सा-याच लोकायचा परमुख व्यवसाय होता कास्तकारी. कोरळवाहू जमिनीतूनं जे निंघन, ऊगवन थे हाती पळनं. गावात दोनं सधन कास्तकार होते. लायने कास्तकार आपल्या वा-वरातलं कामं अटपूनं दोही पाटलाच्या वावरात जे भेटनं थे काम करत असत. मंग नांगरटी असो, पेरनं असो, टोपनं असो, निंदन असो, फेर देनं असो, कापूस येचनं असो, सोंगनं असो, सरवा येचनं असो, फन-प-हाट्या येचनं असो वा घरचं काह्यी काम असो. गावातले दोही सधन कास्तकार हे पाटील होते. पाटलाची दाळी हालनं थेच काम होये. ययच्या वायी, वाटी कोनी जात नसे. अवघं गाव खावूनं पिवूनं सुखी समाधानी अन् खुसमखुस होतं.

एकनविससे बहात्तरचं सालं ऊगवलं पान्याचं टिपूस आजूबाजूच्या सतरा गावात मिरगात पळळ नाहीं. नद्या, नाले, ईहिरी, झिरे कोळ्ळेठन्न पळळे. लोकायच्या घरात दाना नाह्यी. चिटपाखरं, जनावरं ईनापान्याचे पटापट मराले लागले. ब-याच लोकायनं बंबईची वाट धरली. पाटलाची ईहिर पान्यानं टच्चम भरेलं होती. अन् गोदामात तांदूय, जवारी, दायीच्या थप्या लागल्या होत्या. चळ्याभावानं बळीराम पाटील दायदाना ईकत होता. पोटाच्या भूकीपुळे लोकं बायकायच्या कळे, मुळ्ळे, बाया, तोळे, कोपरबाया, बिचवेच काय त मंगयसुतर ही बळीराम पाटलाले ईकत. अन् थ्या बदल्यात थो चार पायल्या धान अन् चार घळ्ळ्या पानी दे.

अस् करता करता लोकाय जौळचं सोनंनानं, जनावर , जेमिनी विकल्या गेल्या. ह्याच गावात एक गरीब खटलं होतं. सखाराम अन् वच्छला. ययले दोनं लेकरं होती अन् सखारामचे बुडाबुडी. अस सा झनाचं खटलं. जौळ होतं नोतं सारं काह्यी बळीरामा पाटलाच्या घश्यात गेलं होतं. पोरं अन् म्हतारे भूकीनं पिसायले होते. वच्छला अन् सखारामले तेयची भूक पाव्हल्या जात नोती. सखाराम दारात डोक्शावर हात ठेवूनं निरास बसला होता. तितल्यात सखारामले गावातला आक्या आंगनात हागतानी दिसला. थो शेनाजौळ गेला. शेनात थ्याले तुरीच्या अख्या घुग-या दिसल्या . थ्यानं सारं शेनं टोपल्यात जमा करूनं आनलं. शेनं ऊलिश्या पान्यानं धुतलं. तुरी अल्लग केल्या. चूलं पेटोली. ताव्यावर भाजल्या अन् ऊलीऊली सा-यायले तासकित देल्ल्या. सा-यायनं गपगुमान मटमट खाल्ल्या. असेचं दिसरात भूकीनं लोटत होते.

वच्छलाच्या तरनेपनावर बळीराम पाटील लट्टू होता. त्यानं आंदी लय ठावकूर तिले मूठीत बांधन्याची कोशिस होती पन् वच्छला मासूयी सारखी निसटूनं जाये.



सखारामच्या घरातलं होतंनोतं सारं काह्यी सरलं होतं. लेकरं , मायबाप अन् बायको भूकीनं कासावीस होतं होते. सखाराम वावरात टोपलं घेवूनसन्या गेला. टोपल्यात कायेभेरं ढेकळं आनले. पान्यानं कालवले. अन् तासकित लेकरायले अन् मायबापाले देल्ले . सा-यायनं थो गारा भूकीच्या सपाट्यात सुंहा केला. वच्छला थे घरातलं चितरंग पाहूनं कासावीस झाली. डोयाले लुगळ्याचा पदर लावत ढसाढस लळाले लागली. शियानं पळत होती. गाव अंधारात गुळूप झालं होतं. वच्छलानं आंगात ताकद भरत मोठा सास घेत टायवरी घातली अन् बळीराम पाटलाच्या वाळ्याच्या दिशेनं चालं केली. रातची दा ची अजान चाल्ली होती. वच्छलानं पाटलाच्या दाराची साखयं थरथरत वाजोली. बळीरामनं डोये चोयत दार ऊघळलं. दारात पायते त काय वच्छला. पाटलाच्या आंगावर काटे ऊभे झाले. काये मनसुबे जागरूत झाले. पाटील बोल्ला.

कसं काय येनं केलं बाप्पा ईकळे.

कयना कोंडा नाह्यी त मिलोची जवारी असनं त द्या ना. काहाले कयना कोंडा. तांदूय, गहू देतो ना तुले.

द्या ना बापा. तुमचे लय ऊपकार होतीनं. दो दिस झाले लेकरं अन् मामा मामी ऊपाशी हायेती. भूकीनं लै पिसायले थे. पाव्हल्या जात नाह्यी जित्याडोयानं.

देतो...सारं देतो पन् माह्या भूकीचं काय?


कोन्ची भूक.

येड घेवूनं पेळगावले जावू नोको. तू म्हनशीनं थे देतो पन् मले जे पाह्यजेनं थे तुले द्या लागनं.

अहो! पाटीलजी आपनचं ह्या गावाचे मायबाप हा. अश्या दुष्कायात तुम्हीच अस् बोल्ले त आम्ही गरीबायनं कुट्सा जावं. मले जे पाह्यजेनं थे देत असनं त तुले सारं काह्यी देतो. नाह्यी त जाय चुल्यात. खाली मान घालूनं ना ईलाजानं वच्छलानं होकारं देल्ला. पाटलाच्या ऊरात अन् पोटात गुदगुल्या झाल्या. कुळोभर जवारी अन् दोन पायल्या तुरीची दाय मोजूनं वच्छलाले देल्ली. पाटलानं वच्छलाचा हात धरला. हात धरता धरता हातातला बिल्लोरं टिचरला. अन् आठ साल आंधीपासूनचा मनसुबा पार पाळ्ळा. वच्छलाचं कुकू माथ्यावर पसरलं होतं. केस ईस्कटले होते. तीचं आंगन् आंग थरथरत कापत होतं. तीनं अनाजाचं पोतं ऊचललं अन् घराच्या दिशेनं लागली. आंगनात आली पोतं खाली ठेवलं अन् भोंड येवूनं वच्छलानं जगाचा अखेरचा निरोप घेतला.

**– सु. पुं. अढाऊकर**
अकोला.
मो. ९७६९२०२५९७

# शेतशिवाराच्या दु:खाचे चिंतनकाव्य : समष्टी



कवी दत्ता शिंदे लिखित 'समष्टी' या काव्यसंग्रहाचे प्रकाशन आज मान्यवरांच्या हस्ते होणार आहे. त्यानिमित्त हा साधलेला लेखन संवाद.

**पुस्तक परीक्षण**
**प्रा. डॉ. व्यंकटी पावडे**
मराठी विभाग प्रमुख
के. आर. एम. महाविद्यालय, नांदेड
मो. ९६५७२७८२१७

अपार कष्ट झेलून आयुष्याचे गोंडर झालेल्या शेतकऱ्यांची वेदना मांडणारा 'समष्टी' हा कवी दत्ता शिंदे यांचा पहिला काव्यसंग्रह आहे. न्यू मॅन पब्लिकेशन परभणी यांनी हा काव्यसंग्रह प्रकाशित केला.मराठवाड्यातील ग्रामीण कवी जगदीश कदम यांची अर्थपूर्ण प्रस्तावना व अत्यंत मोहक मुखपृष्ठ या संग्रहाला लाभले आहे. शेती, माती, शेतकरी आणि स्त्रीची वेदना या कवितेचा मुख्य गाभा आहे. शेतकऱ्याच्या जीवनातील संघर्षशील प्रसंग आणि भोवतालातील तणाव मांडणाऱ्या सत्तावन पृष्ठीय या संग्रहामध्ये एकूण सदत्तीस चिंतनशील कविता आहेत. रानात राब राब राबणाऱ्या अनंत मुक्तात्म्यांना या अर्पण पत्रिकेने या काव्यसंग्रहाची सुरुवात होते यावरून या कवीची कृषीनिष्ठा किती अढळ व भक्कम आहे याची साक्ष पटते. ही कविता कृषी प्रश्नांचे वास्तववादी चिंतन मांडणारी आहे.

मध्ययुगीन काळात मराठीतील संतांनी 'समष्टी' हा शब्द वापरला. त्यांनी अभंगाच्या माध्यमातून समष्टीच्या सुखदुःखाचे विवेचन केले आहे. तो शब्द कवी दत्ता शिंदे यांनी एका व्यापक अर्थाने वापरला असावा म्हणून समष्टीचे दुःख मांडण्यासाठी त्यांनी कवितेचे बोट धरले आहे असे वाटते. या कवितेत मानवी जगण्याचे मूल्य सापडते. सभोवतालच्या जटील प्रश्नांची चिकित्सा आहे. या कविता केवळ कविता नाहीत, तर लाखो कास्तकारांच्या रक्तबंबाळ आयुष्याचे त्यामध्ये हुंदके आहेत. शोषणाचे आवाज या कविला ऐकू येतात. मूलभूत प्रश्नांच्या पूर्ततेसाठी लढा देणाऱ्या कष्टकरी माणसांच्या जीवघेण्या आयुष्याची ठणक या कवितेच्या शब्दशब्दातून बाहेर पडते. गाव शिवारात राबणाऱ्या माणसांच्या भळभळत्या जखमा,त्यांचे दुःख,दारिद्र्य,अवहेलना, मानापमान या कवितेतून व्यक्त झाली आहे. शेती प्रश्नांची ओढ असणारी ही कविता गाव शिवाराचे चिंतनकाव्य आहे. कवी दत्ता शिंदे यांचे बालपण हे एका खेडेगावात शेतकरी कुटुंबात गेल्यामुळे शेती प्रश्नांची वास्तव जाण त्यांना आहे म्हणून त्यांचे काव्य प्रयोजन हे विनोद किंवा मनोरंजन नाही तर त्यांच्या अवतीभोवतीचा वास्तववादी शेतकरी माणूस आहे.

कोणत्याही कलावंताला शोषणाचे हुंदके ऐकू येतात. कवी दत्ता शिंदे त्यापैकी एक आहेत. कृषीप्रधान देशातील शेती व्यवस्थेला सुरुंग लावणाऱ्या व्यवस्थेला हा कवी उद्ध्वस्त करू पाहतो. असंघटित शेतकऱ्याचा आवाज बुलंद करण्यासाठी लेखणीचे हत्यार या कवीने उचलले आहे. शेतकऱ्याचा वकील होऊन लढा देणारा हा कवी अनेक कवितातून शेतकऱ्याच्या मनातील विद्रोह व्यक्त करतो. सामाजिक दुःखाने अस्वस्थ होतो. या कविता वाचकांना विचार करायला भाग पाडतात. 'वेळ आली' ही कविता त्यापैकी एक आहे या कवितेतील काही ओळी शेतकरी मनातील संताप, चीड व्यक्त करणाऱ्या आहेत.

**शेव झाल्या नांगराला**
**करळ करायची वेळ आली**
**मुंडी झाली आवताची**
**फास धार चढवायची वेळ आली**

अशा विद्रोही भावनेतून शेतकऱ्यांना लुटणाऱ्या सावकार, लबाड राजकारणी, कृषी धोरण ठरवणाऱ्या कावेबाज धोरणकर्त्यांना ते लेखणीच्या आसूडाने सडकून काढतात. 'समष्टी' या काव्यसंग्रहातील कविता ही शेतकऱ्यांचे प्रतिनिधित्व करणारी आहे. या कवितेत कोरडा आणि ओला दुष्काळ येतो. शेती प्रश्नांच्या मुळाची चिकित्सा येथे होते. ही कविता शेतकरी दुःखाची गाथा आहे. काळ्या आईच्या कुशीत राबणाऱ्या माणसांची वेदना या कवितेतील शब्दाशब्दातून प्रकटते.रानाचे अभंग, नभाच दान, गणगोत,आला मिरुग जोरात, नशिबाचा खेळ, बळी, गावपांढरी इत्यादी कवितेमधून शेती प्रश्नांचे कवीचे भान किती सजग आहे हे प्रकर्षाने जाणवते.

नातेसंबंधातील अटत चाललेली माणुसकी, लोकशाहीच्या गोंडस नावाने चाललेला भोंगळ कारभार,वाढता अनागोंदीपणा, झुंडशाही, भ्रष्टाचारी लोक, स्त्री जीवनाची होणारी वाताहत कोंडी होरपळ, हरवत चाललेली मानवता यामुळे कवी दत्ता शिंदे यांचे मन अस्वस्थ होते मग या अस्वस्थ मनातून त्यांच्या कवितेचा जन्म होतो. ही कविता तरुण तरुणीच्या लुब्ध प्रेमावर भाळलेली नाही, प्रेयसीच्या स्वप्नात बुडणारी किंवा तीच्या गोऱ्या गालावर भूललेली नाही तर सामान्य शेतकरी व मध्यमवर्गीय माणसांच्या मूलभूत प्रश्नांवर चिंतन करणारी एक चिंतन कविता आहे. नाही जमले, शब्द, पायवाट, ती, कधी, पोरी, लोकशाही, एक झाड, विकृती या कवितेतून कवीची सामाजिक अस्वस्थता किती टोकदार आहे हे जाणवते. बगळे गेले आणि कावळ्याची सत्ता आली (लोकशाही), अगरबत्ती सारखा धुपलो पेटणे नाहीच जमले (नाही जमले), माय बाईचं दुखणं एका दगडाला कळते (पोरी), हातात घेऊन गोफण फिरवायची वेळ आली (वेळ आली). अशा काही कवितांच्या ओळी मधून कवी मनातील सल बाहेर पडते. ही सल व्यक्तिगत नाही तर सामाजिक दुःखाची जाणीव करून देणारी आहे. या विचारांना सामाजिक जाणिवेचा स्पर्श आहे. सामाजिक वेदना दूर करण्यासाठी या कवीची धडपड आहे.

'समष्टी' या काव्यसंग्रहातील कवितेला शेणामातीचा गंध आहे. पहिल्या पावसानंतर जसा मातीतून अत्तराचा सुगंध येतो तसा या कवितेलाओल्या मातीचा सुवास आहे. रानशिवारातील माणसांचा व त्याच्या दुःखाचा, जखमांचा शोध या कवितेने घेतला आहे. मराठवाडी बोली भाषेतील शब्दाने समृद्ध असणाऱ्या या कवितेची भाषाशैली सहज सोपी आहे. सामान्य माणसांच्या दैनंदिन जीवनातील भाषेने ती सजलेली आहे.अर्थपूर्ण प्रतिमा व प्रतीक तिच्यात आहेत. अलंकारिक भाषा,अवजड शब्द यापासून ही कविता दूर राहते.ती जनसामान्यांच्या भाषेतून व्यक्त होते. वाचकांच्या विचारांना प्रवृत्त करणारी ही कविता इथल्या व्यवस्थेला प्रश्न विचारणारी आहे म्हणून ती वाचकांना अंतर्मुख करणारी आहे. बदलत्या गावगाड्याचे चित्रण करणारी ही कविता मराठी ग्रामीण कवितेची परंपरा समृद्ध करणारी आणि कवितेची वाट रुंद करणारी आहे त्यामुळे निश्चितच या चिंतनकाव्याचे वाचक, लेखक, रसिक, विद्यार्थी, संशोधक स्वागत करतील ही मनोमन आशा आहे.

**संदर्भ: समष्टी (काव्यसंग्रह),**
**कवी-दत्ता शिंदे,**
**न्यू मॅन पब्लिकेशन परभणी,**
**प्रथम आवृत्ती डिसेंबर २०२४,**
**पृष्ठ ५७,**
**मूल्य १५०**

# एक निस्वार्थी आणि प्रेमळ व्यक्तिमत्त्व- प्रभू सावंत

प्रभू सावंत हे एक आंबेडकरी चळवळीतील अग्रगण्य नाव. मुदखेड तालुक्यातील कोल्हा येथे १५ जून १९६४ साली जन्म झाला. वडील सटवाजी सावंत रेल्वेमध्ये गँगमनचे मुकदम. वयाच्या दुसऱ्या वर्षीच आईचे छत्र हरपले. आईच्या प्रेमापासून पोरकेपणाचे चटके सहन केल्यामुळेच की काय, त्यांच्या अंगी मातृत्त्वाचा गुण प्रकर्षाने दिसून येतो. परिस्थितीची जाण आणि भान ठेवून त्यांनी बी. ए. डी. एड. पर्यंत शिक्षण घेऊन अगदी कमी वयात शिक्षकी पेक्षा पत्करला आणि कुटुंबाची आर्थिक घडी बसविण्यात यश संपादन केले.



४ ऑगस्ट १९७८ साली नामांतर शहीद पोचीराम कांबळे यांच्या हत्येची बातमी प्रभू चौदंते यांच्या कानावर पडली आणि तेव्हापासून ते बेचैन झाले. याच एका घटनेमुळे ते आंबेडकरी चळवळीकडे वळल्या गेले. १९८५ साली ते आंबेडकरी चळवळीत सक्रिय झाले ते आजपर्यंत कार्यरत आहेत. शिक्षण क्षेत्रात शिक्षकाच्या माध्यमातून प्रवेश केल्यानंतर ते शांत बसले नाहीत. विद्यार्थ्यांना घडविण्याचा घेतलेला वसा त्यांनी प्रामाणिकपणे निभावला आहे. विद्यार्थ्यांबरोबरच ते शिक्षकांच्या अडीअडचणी सोडविण्यामध्येही अग्रेसर आहेत. अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघटनेचे प्रदेश उपाध्यक्ष पदाची जबाबदारी समर्थपणे सांभाळत या कार्यकाळात त्यांनी अनेक शिक्षकांना न्याय मिळवून दिला आहे. मुदखेड तालुक्याचा परिसर शिक्षण घेण्यात आणि खेळण्याबागडण्याचा त्यांनी पिंजून काढला असला तरी त्यांची कर्मभूमी म्हणून नांदेड जिल्हा त्यांना चांगल्या प्रकारे ओळखतो. त्यांच्या हसऱ्या आणि मनमिळावू स्वभावामुळे त्यांनी अनेक मित्र जमविले आहेत. कारण त्यांचा हात केव्हाही मदतीसाठी पुढेच राहिला आहे. त्यांच्या या सहकार्य वृत्तीमुळे ते आज सेवानिवृत्तीनंतरही ताठ मानेने समाजात वावरताना दिसून येतात. एवढेच नाही तर ते आज समाजाचे एक आशास्थान बनले आहेत. म्हणून युवकांची गर्दी त्यांच्या अवतीभवती दिसून येते. आजच्या युवकांना ते योग्य असे मार्गदर्शन करतात. स्वावलंबी बना, स्वाभिमानी व्हा, हा त्यांचा मूलमंत्र युवकांसाठी प्रेरणादायी आहे. आज त्यांचा वाढदिवस. त्यानिमित्त त्यांना दीर्घायुष्य लाभो हीच प्रांजळपणे मनीषा.

**–गंगाधर वडणे**
नांदेड

# 'मल्लखांब नामशेष होण्याच्या मार्गावर'!

मनोरंजन व शारीरिक व्यायाम यासाठी केली जाणारी कोणतीही कृती म्हणजे खेळ होय. खेळणे ही माणसाची नैसर्गिक प्रवृत्ती आहे. शिकार हा जसा उदरनिर्वाहाचा मार्ग होता,तसा खेळ हा मनोरंजनाचा एक भाग आहे.

भारतीय क्रीडा प्रकारात मल्लखांब अतिशय महत्त्वाचा व्यायाम प्रकार आहे. पण आजची तरुण पिढी या क्रीडा प्रकाराकडे दुर्लक्ष करीत आहे. प्रत्येक जण व्यायाम शाळेत जाऊन खेळाचे प्रकार शिकत आहेत. जिम मध्ये जाऊन व्यायाम करणे हा प्रतिष्ठेचा प्रकार मानला जात आहे.

जो तो उठसूठ जिम मध्ये जाऊन शरीर बलवान, काटक झाल्याचे सांगतो. परंतु मल्लखांब हा क्रीडा प्रकार प्राचीन काळापासून भारतात सुरू आहे. तो नामशेष होतो की काय?अशी मनात भीती निर्माण झाली आहे.सध्याची तरुण पिढी या खेळाकडे खरोखरच दुर्लक्ष करीत आहे.सध्या मोबाईल मुळे सर्वच खेळाकडे जाणून-बुजून लहानापासून ते वृद्धापर्यंत दुर्लक्ष केले जात आहे. हे वास्तविक व कटू सत्य आहे.

आज आंतरराष्ट्रीय मल्लखांब दिन असल्यामुळे त्याची माहिती तरुण पिढीला व्हावी,त्यांचे शरीर बळकट व्हावे, शारीरिक कसरती कराव्यात मातीतले खेळ खेळावेत.नैसर्गिक दृष्ट्या शरीराला उपयुक्त असलेले खेळ खेळावेत या उद्देशाने हा लेखन प्रपंच...१८१८ मध्ये पेशव्याच्या काळात ही मल्लखांबाचेआखाडे चालू होते. तेव्हाच त्याचा जन्म झाला अशी नोंद सापडते.नंतर मल्लखांब खेळाची सुरुवात नाशिक मधून ही झाली त्याच नाशिकात आज हा खेळ लोप पावत



चालला आहे.याची मनाला खंत वाटते. वणी, त्र्यंबकेश्वर, कोठारे या गावातील आखाडे आता कमी झालेले आहेत.प्रशिक्षक बोटावर मोजण्या एवढे शिल्लक राहिलेले आहेत.नवीन येणाऱ्या खेळाडूंची संख्या अतिशय त्रोटक असून त्यामुळे या खेळाविषयी उदासीनता सर्वत्र निर्माण झाली आहे.१९३६ मध्ये झालेल्या जर्मनीची राजधानी बर्लिन येथील ऑलिंपिक स्पर्धेत मल्लखांब क्रीडा प्रकाराचे प्रात्यक्षिक सादर केले होते. त्यामुळे हा क्रीडा प्रकार जगाला ज्ञात झाला. आज जर्मनीतील कोलून विद्यापीठात मल्लखांबाचा सराव व संशोधन पर कार्य चालू आहे. त्यानंतर युरोप खंडातील अनेक देश या खेळाचे तोंड भरून कौतुक करतात. अनेक ठिकाणी कवायती सादर केल्या जातात. महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, कर्नाटक, गुजरात, पंजाब, बिहार, उत्तर प्रदेश, वाराणसी, ग्वाल्हेर, इंदोर, उज्जैन, भोपाळ, बडोदा, सुरत येथे आजही कमी जास्त प्रमाणात आखाडे मल्लखांबाच्या कवायतीचे प्रात्यक्षिक व सराव चालू आहेत. म्हणून तरुणांनी मल्लखांबाचे प्रात्यक्षिक सादर करावेत. आपल्या देशाची शान वाढवावी. मर्दानी खेळ खेळावेत. शरीर पिळदार बनवावे. कुस्तीगीर खाशाबा जाधव सारखे नाव देशात अजरामर करावे व या खेळाला पूर्वीची प्रतिष्ठा मिळवून द्यावी.

बाळंभट्ट दादा देवधर हे मल्लखांबाचे जनक आहेत. कुस्तीपटूच्या अंगी फक्त शक्ती असून चालत नाही, तर त्यांच्या अंगात चपळता,लवचिकता तसेच अनेक प्रकारचे वेगवेगळे डावपेच असणे अतिशय गरजेचे आहे. या सर्व गुणाबरोबर कुस्तीगीरांचा दम सुद्धा वाढणे महत्त्वाचे आहे. मल्लखांब हा साधारणपणे दोन ते अडीच मीटर उंचीचा असून, तो सागवानी लाकडाचा असतो. वरच्या दिशेने निमुळता व खालच्या दिशेने जाड असतो. सर्वसाधारणपणे मल्लखांबाचे अंग, मान व बोंड असे तीन भाग पडतात. सगळ्यात वरचा गोलाकृती भाग म्हणजे बोंड होय. मध्यभागी असलेला व निमुळता नसलेला भाग म्हणजे मान होय. मल्लखांबाच्या बुंध्यापासून माने पर्यंतच्या निमुळत्या होत जाणाऱ्या भागास अंग असे म्हणतात.

आता आपण पूर्वीच्या मल्लखांबाच्या प्रकाराविषयी माहिती घेऊ.. त्यात १) वेताचा मल्लखांब, २) हल्यारी मल्लखांब, ३) पलित्याचा मल्लखांब ४) उसाचा मल्लखांब असे चार प्रकार पडतात, तर आताच्या मल्लखांबाचे तीन प्रकार आहेत.१) पुरलेला मल्लखांब २) टांगता मल्लखांब ३) दोरीचा मल्लखांब.

अशाप्रकारे एकाच मल्लखांबाचे असे अनेक प्रकार आपल्याला या ठिकाणी पाहता येतात. खरोखर हे अनेक प्रकार व्यायामाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे आहेत. सर्व विद्यालयांमध्ये मल्लखांबाचे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना द्यावे. शासनाने विद्यार्थ्यांच्या वाढीसाठी व तंदुरुस्तीसाठी मल्लखांब प्रत्येक शाळेत उपलब्ध करून दिल्यास अढी, तेढी, बगली, दसरंग, फिरकी, सुईदोरा, वेल, उतरती, झाप, चमत्कृतीजन्य कामे, सलाम्या, ताजवे, उड्या, आरोहण-उड्या आसने, फरारे असे १६ प्रकारचे कौशल्य शिकविले जातील हे या ठिकाणी आवर्जून सांगावे वाटते. खरोखर मल्लखांब हा किती महत्त्वाचा आहे. हे आता आपल्या लक्षात आले असेल, सगळ्यात व्यायामाचा महत्त्वाचा आणि वरच्या दर्जाचा प्रकार म्हणजे मल्लखांब होय.याच्यापासून आरोग्याला चांगला लाभ होतो आपले शरीर पिळदार बनते.

शरीराच्या आतील इंद्रियेच्या क्रिया सुधारतात. सर्व स्नायूंना उत्तम प्रकारे ताण पडून ते मजबूत होतात. या कौशल्यामुळे शरीर लवचिक होते. पुष्कळ वेळा डोके वर पाय खाली, पाय वर डोके खाली करावे लागते. त्यामुळे रक्ताभिसरणाचे कार्य सुधारते व आरोग्य चांगले राहते. काही महत्त्वाच्या खेळाच्या प्रशिक्षणासाठी पुढील ठिकाणी महत्त्वाचे कार्य बजावतात. वडोदरा येथे व्यायाम शाळा जुम्मा दादा यांची पतीयाळा येथील क्रीडा विद्यापीठ, गांधीनगर कोल्हापूर येथील खासबाग व मोतीबाग तालीम, अमरावती येथील हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ ,पुणे येथील बालेवाडी व श्री शिवछत्रपती क्रीडा स्कूल कुस्ती हे खेळाच्या प्रशिक्षणासाठी प्रसिद्ध ठिकाणे आहेत. खेळामध्ये जीवनातील व्यथा आणि चिंता विसरायला लावण्याचे सामर्थ्य आहे. मनाला विरंगुळा देणे, ताजीतवाने करणे, तसेच शारीरिक हालचाली वेगाने करणे, शरीर काटक व बळकट बनविणे, तसेच खेळामुळे मनोधैर्य, चिकाटी, खिलाडूपणा या गुणाची वाढ होते. तसेच खेळामुळे आपापसातील सहकार्य, संघ भावना वाढीस लागतात. म्हणून खेळ हा जीवनातला महत्त्वाचा भाग आहे. खेळाचे मैदानी खेळ व बैठे खेळ असे प्रकार केले जातात. या दृष्टीने आपण मल्लखांबाची शारीरिक कसरतीच्या खेळामध्ये समाविष्ट होतो. वानराच्या झाडावरील क्रीडा पाहून बाळंभट्ट देवधर यांना हा खेळ सुचला असे म्हटले जाते. श्रीमती मनीषा बाठे यांनीही संशोधन करुन कुस्तीसाठी मल्लखांब व त्यातील पकडी यांची निर्मिती केली. मल्लखांब क्रीडा प्रकारात जागतिक स्तरावर भारताचे नाव उज्वल करणाऱ्या सर्व मल्लांना विठू माऊली प्रतिष्ठान खैरकावाडीच्या वतीने आंतरराष्ट्रीय मल्लखांब दिनाच्या सर्वांना खूप खूप शुभेच्छा..

**–प्रा. विठ्ठल बरसमवाड**
अध्यक्ष : विठू माऊली प्रतिष्ठान,
खैरकावाडी ता.मुखेड जि.नांदेड

# मतलबी

अश्रू माझेच कसे मतलबी हो झाले
वाहून गेले डोळ्यातून पाहून दुःख माझे

रणरणत्या उन्हातही चालतो मी एकटा
कोण येईल कमी करण्या मनावरचे ओझे

पारध्याने जाळे लावून घात जसा केला
जीव तसा माया मोही अडकून पडला

गर्दी जमली लाख परी सोडवेना कुणी
चक्रव्यूहात जसा अभिमन्यू सापडला

विश्व माझे मानून मी पुजले जयांना
लचके तोडण्या गाव एक झाला सारा

उभे केले ज्यांना मी विकून माझे स्वप्न
घरातून माझ्याच बाहेर फेकला पसारा

ठिणगी पडता पेटल्या भावना मनीच्या
वणवा भडकला कधी होईल बरसात

धगधगत्या ज्वाला रान भस्म करत जाती
विझला अकस्मात दिवा होता जो परसात

अंत नको पाहू आत्मबळ देई मजला
आधार नको नव स्फूर्ती भर देवा देही

सुटका कर मतलबी या दुनियेतून सत्वर
जळतो जीव फार आता होते लाहीलाही

**–पवन कुसुंदल,नांदेड**
नांदेड
मो. ९०७५५९५६९५

## थोडक्यात...

### समस्याग्रस्त व पीडित महिलांसाठी उद्या लोकशाही दिन

**नांदेड (प्रतिनिधी)–** समस्याग्रस्त व पिडीत महिलांसाठी सोमवार, दि. १६ जून २०२५ रोजी महिला लोकशाही दिन आयोजित केला आहे. या लोकशाही दिनात समस्याग्रस्त व पिडीत महिलांनी आपले अर्ज विहित नमुन्यात सादर करावे, असे आवाहन जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिन समितीचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी नांदेड व सदस्य सचिव तथा जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी नांदेड यांनी केले आहे.

दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली महसूल प्रबोधनी प्रशिक्षण केंद्र, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, नांदेड येथे महिला लोकशाही दिन होणार आहे. संबंधीत समितीचे सदस्य व शासन निर्णयात नमूद संबंधित विभागाचे अधिकारी यांनी उपस्थित रहावे, असेही आवाहन सदस्य सचिव तथा जिल्हा महिला व बालविकास अधिकारी नांदेड यांनी केले आहे.

### महिलेचा विनयभंग; गुन्हा दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)–** धनेगाव येथील तिरुपती सोसायटीमधील मधुबन शाळेच्या बाजुला राहणाऱ्या एका महिलेचा विनयभंग झाला आहे. या प्रकरणी महिलेच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

धनेगाव येथील तिरुपती सोसायटीत राहाणाऱ्या एका दलित महिलेला दि. १२ जून रोजी रात्री घरी जाताना येथे उभ्या असलेल्या केशव गोविंदराव देशमुख, मारोती गोविंदराव देशमुख, नवनाथ गोविंदराव देशमुख, माधव गोविंदराव देशमुख या भावांनी जातीवाचक शिवीगाळ विनयभंग केला. याप्रकरणी महिलेच्या तक्रारीवरून चौघांवर विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# किसान क्रेडिट कार्डधारकांनी वेळेवर नूतनीकरण करावे

## जिल्हाधिकारी कर्डिले यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय सल्लागार समितीची बैठक



**नांदेड (प्रतिनिधी)–** किसान क्रेडिट कार्ड (केसीसी) योजना शेतकऱ्यांनी अतिशय लाभदायक योजना आहे. या कार्डचे शेतकऱ्यांना अनेक लाभ घेता येतात. त्यामुळे किसान क्रेडिट कार्डधारक शेतकऱ्यांनी वेळेवर नूतनीकरण करावे, असे आवाहन नांदेड जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक बी.जी. सोनकांबळे यांनी केले आहे.

जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय सल्लागार समितीची आढावा बैठकपार पडली. या बैठकीला जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक बी.जी. सोनकांबळे, नाबार्डचे जिल्हा विकास व्यवस्थापक दिलीप दमयावार, भारतीय रिझर्व बँकेचे नांदेड जिल्हा अग्रणी अधिकारी अरूण बाबू, जिल्हा अग्रणी बँकेचे वरिष्ठ सहायक श्याम पांचाळ यांच्यासह शासकीय, खासगी व सहकारी बँक महामंडळातील अधिकारी, प्रतिनिधींची उपस्थिती होती.

या बैठकीत जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी मार्गदर्शन केले आणि जिल्ह्यातील कामांचा आढावा घेतला. किसान क्रेडिट कार्डचा लाभ जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांना मिळाला पाहिजे, अशी सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी बैठकीत केली. जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक बी.जी. सोनकांबळे यांनीही किसान क्रेडिट कार्डधारक शेतकऱ्यांसाठीचे अनेक लाभ सांगितले. ते म्हणाले की, केसीसीचे वेळेवर नुतनीकरण करण्याचे फायदे अनेक आहेत. जसे की, शेतकऱ्यांना आर्थिक स्थैर्य मिळते. यामुळे आपली पत चांगला राहतो. उशीर किंवा थकबाकीमुळे तुमच्या पतक्षमतेवर परिणाम होऊ शकतो. केसीसी वेळेत पुनर्भरण केल्यास सरकारकडून मिळणारी व्याज सवलत पुढेही चालू राहते. आपल्या नेहमीच्या आर्थिक गरजांसाठी हातात पैसा खेळता राहतो. केसीसी वेळेत नूतनीकरण केलेल्या शेतकऱ्यांना पेरणी, कापणी यांसारख्या महत्वाच्या कालावधीत गरजेनुसार पैसा उपलब्ध होतो. त्यामुळे शेतकऱ्यांनी जबाबदार कर्जदार बनण्यासाठी केसीसीचे वेळेवर नूतनीकरण करा आणि तुमचा सिबिल स्कोअर सांभाळा, शासकीय लाभ मिळवा, आणि तुमचा शेती प्रवास अधिक सक्षम बनवा, असे आवाहन नांदेड जिल्हा अग्रणी बँकेचे व्यवस्थापक बी.जी. सोनकांबळे यांनी जिल्ह्यातील केसीसी धारक शेतकऱ्यांना केले आहे. तसेच याबाबत काही शंका असल्यास किंवा अधिक माहितीसाठी किंवा मदतीसाठी जवळच्या बँक शाखेत किंवा कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहनही नांदेड जिल्हा अग्रणी बँकेचे व्यवस्थापक बी.जी.सोनकांबळे यांनी केले.

# कॅप्टन आशिष दामले यांच्या तत्परतेमुळे क्रिकेटपटू ईशानचे स्वप्न होणार साकार



**नांदेड (प्रतिनिधी)–** इंग्लंड येथे क्रिकेट प्रशिक्षणासाठी निवड होऊनही आर्थिक विवंचनेमुळे इंग्लंडला जाऊ न शकणाऱ्या नांदेडचा क्रिकेटपटू ईशान बासरकरला ब्राह्मण महासंघाचे प्रदेशाध्यक्ष निखील लातूरकर यांच्या पुढाकारातून व परशुराम आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष कॅप्टन आशिष दामले यांच्या तत्परतेमुळे आर्थिक मदत मिळाल्याने त्याचे इंग्लंडला जाण्याचे स्वप्न साकार होणार आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, नांदेडचा नवोदित क्रिकेटपटू ईशान बासरकर याची क्रिकेट मास्टर अकॅडमीतर्फे इंग्लंड येथे क्रिकेट प्रशिक्षणासाठी निवड झाली. परंतु घरची आर्थिक परिस्थिती बेताची असल्याने त्याच्या कुटुंबियांनी महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष निखील लातूरकर यांच्याशी संपर्क साधला व परशुराम आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष आशिष दामले यांना भेटण्याची व आर्थिक मदतीची अपेक्षा व्यक्त केली. नवोदित क्रिकेटपटूला आर्थिक अडचणीमुळे आपले स्वप्न पूर्ण करणे शक्य होत नाही, ही बाब गांभीर्याने घेत निखील लातूरकर यांनी उभयतांची भेट घडवून आणली. यावेळी करवीर पिठाचे शंकराचार्य यांनीही आशीर्वाद व शुभेच्छा दिल्या.

टॅलेंट असून देखील आपला समाजबांधव केवळ आर्थिक परिस्थितीमुळे इंग्लंडला क्रिकेट प्रशिक्षणासाठी जाऊ शकत नाही, याची खंत कॅप्टन आशिष दामले यांना जाणवल्याने त्यांनी आर्थिक हातभार म्हणून ५० हजार रुपयांची तातडीची मदतीचा धनादेश क्रिकेटपटू ईशानला सुपूर्द करण्यात आला. या मदतीमुळे ईशान आता आपले स्वप्न पूर्ण करण्यासाठी इंग्लंडला लवकरच रवाना होईल. आशिष दामले यांच्या या तत्परतेमुळे परशुराम आर्थिक विकास महामंडळ अध्यक्ष म्हणून त्यांची झालेली निवड सार्थ ठरली असल्याची प्रतिक्रिया निखील लातूरकर यांनी व्यक्त केली आहे.

ब्राह्मण समाजासाठी सदैव कार्यरत असणारे नेतृत्व परशुराम आर्थिक विकास महामंडळ अध्यक्षरुपी लाभलेले असून महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यात कॅप्टन आशिष दामले यांनी प्रवास केला असून भविष्यात ब्राह्मण समाजाला यथायोग्य मदतीसाठी सक्षमपणे सहकार्य करतील अशी आशा निखील लातूरकर यांनी व्यक्त केली.

# विविध गंभीर गुन्ह्यांतील तिघांना छत्रपती संभाजीनगर येथून अटक; स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई



**नांदेड (प्रतिनिधी)–** शहर व जिल्ह्यात खूनाचा प्रयत्न यासोबतच गंभीर दुखापत करून फरार असलेल्या तिन्ही आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने छत्रपती संभाजीनगर येथून अटक केली आहे.

पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी जिल्ह्यातील अभिलेखावरील पाहिजे आरोपींचा शोध घेऊन त्यांच्यावर कारवाई करण्याचे आदेश स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांना दिले होते. त्यावरुन दि.११ जून रोजी पोलीस निरीक्षक खंडेराय यांनी सहायक पोलीस निरीक्षक विठ्ठल घोगरे यांना जिल्ह्यातील अभिलेखावरील पाहिजे आरोपीतांचा शोध घेऊन मिळून आल्यास त्यांच्यावर कारवाई करण्याचे आदेश दिले. सपोनि विठ्ठल घोगरे हे त्यांच्या पथकासह पेट्रोलिंग करत असताना त्यांना मिळालेल्या गोपनीय माहितीवरून, पोलीस ठाणे नांदेड ग्रामीण व पोलीस ठाणे भाग्यनगर यांच्या अभिलेखावरील पाहिजे आरोपी साईसिंह दिपकसिंह गहेरवार ऊर्फ साई लाला (वय-२५ वर्ष, रा. बालाजी मंदिराजवळ, सिडको नांदेड) हा छत्रपती संभाजीनगर येथील सातारा परिसरात असल्याची माहिती मिळाल्याने सपोनि घोगरे यांनी त्यांचे पथकासह वरिष्ठांच्या परवानगीने छत्रपती संभाजीनगर येथे जाऊन शोध घेतला. यावेळी आरोपी साईसिंह गहेरवार आणि नितेश परमेश्वर इंगळे पाटील (वय-२१, रा. शिवनगर, नांदेड), निवृत्ती ऊर्फ निलेश रावसाहेब गोरठेकर (वय-२४ रा. बाबानगर, नांदेड) यांना अटक करून पुढील कारवाईसाठी पोलीस ठाणे भाग्यनगर येथे देण्यात आले आहे. पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव, उपविभागीय पोलीस अधिकारी सुशीलकुमार नायक आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांचे कौतुक केले.

# सांगवी येथून प्रथमच आळंदी ते पंढरपूर पायी दिंडी

## वारकऱ्यांचे उत्साहात स्वागत, सांगवी हनुमान मंदिर समितीचा पुढाकार



**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील सांगवी गावातून प्रथमच आळंदी ते पंढरपूर पायी दिंडीचे आयोजन करण्यात आले असून या ऐतिहासिक दिंडीस शनिवारी भाविकांच्या उत्स्फूर्त उपस्थितीत सुरुवात झाली. शिवालय उद्योग समूहाच्या अध्यक्षा संध्याताई बालाजीराव कल्याणकर यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि हनुमान मंदिर समितीच्या सहकार्याने ही दिंडी पंढरपूरच्या दिशेने मार्गस्थ झाली.

या कार्यक्रमाला भागवताचार्य संतोष पुरी महाराज, सांगवी प्रभागाच्या माजी नगरसेविका करुणाताई कोकाटे, सत्यभामा कोकाटे, गुरुवर्य गणेश गिरी महाराज, शिवसेना शहर प्रमुख श्याम पाटील कोकाटे, तालुका उपप्रमुख सत्यवान पाटील अंभोरे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

हनुमान मंदिर व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष पंडितराव कोकाटे, उपाध्यक्ष देविदासराव पवार, आनंदराव कोकाटे, माधवराव कोकाटे, चंद्रकांत कोकाटे, रामजी पवार, शिवाजी कोकाटे, गंगाधर कोकाटे, दिगंबर पवार, गजानन कोकाटे, सतीश कोकाटे, सचिन कोकाटे, पिंटू पवार, अविनाश कुटे, विशाल पांढरे, गजानन कोकाटे, अक्षय कोकाटे, अविनाश कोकाटे, रुपेश कोकाटे, श्रीशांत कपाटे, ज्ञानेश्वर राजेगोरे, आदित्य महले, गोलू कोकाटे आदी या वेळी उपस्थित होते.

कार्यक्रमात श्याम पाटील यांनी दिंडी चालक प्रेम महाराज ठाकूर व दिंडीत सहभागी सर्व वारकऱ्यांचे स्वागत केले व त्यांना पुढील पंढरपूरच्या पायी प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या. या दिंडीमुळे सांगवी गावात आध्यात्मिक वातावरण दिसून आले.

# होरायझन फिजिओथेरपी कॉलेजतर्फे आयोजित रक्तदान शिबिरास प्रतिसाद

**नांदेड (प्रतिनिधी)–** होरायझन कॉलेज ऑफ फिजिओथेरपी, विष्णुपुरी यांच्या वतीने आणि शासकीय रक्त केंद्र, डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय यांच्या सहकार्याने जागतिक रक्तदान दिनाचे औचित्य साधून रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या शिबिरात एकूण ३८ रक्तदात्यांनी रक्तदान केले. फिजिओथेरपी कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी सामाजिक बांधिलकी जोपासत या शिबिराचे आयोजन केले. कार्यक्रमाचे उद्घाटन होरायझन एज्युकेशन कॅम्पसचे सचिव ॲड. संजय रामराव रुईकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष व्यंकटचारी, संचालक डॉ. सदानंद पाटील, कोषाध्यक्ष कांताचारी, डायरेक्टर ओम चारी व ओम रुईकर, फिजिओथेरपी कॉलेजचे प्राचार्य डॉ. रेड्डी, तसेच डॉ. सीमा, डॉ. धनश्री, डॉ. प्रीतीस, डॉ. अरुंधती, डॉ. अर्चना, डॉ. इमरान, डॉ. सुरभी यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाला होरायझन नर्सिंग कॉलेजच्या प्राचार्या मोनिका वानखेडे, कांचन देंगे, अभिमान बेंद्रेकर, यांच्यासह शासकीय रक्त केंद्राचे डॉ. प्रमोद नांदगावकर (मेडिकल ऑफिसर, जीएमसी नांदेड), गिरीश पुराणिक, नाथ कापसे हे देखील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

# सरपंच परिषदेच्या पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठविण्याचे नारायण कदम यांचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)–** सरपंच परिषद मुंबईच्या वतीने राज्यातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या मान्यवरांचा आदर्श पुरस्कार देऊन सन्मान करण्यात येणार आहे. सरपंच परिषद मुंबईचे प्रदेशाध्यक्ष दत्ता काकडे यांनी आदर्श पुरस्कारासाठी संबंधितानी आपले प्रस्ताव ३० जुनपर्यंत नांदेड जिल्हा अध्यक्ष नारायण कदम यांच्याकडे सादर करावेत, असे आवाहन केले आहे.



राज्यातील राजकारण, उद्योग, ग्रामपंचायत, प्रशासकीय अधिकारी, समाजसेवा, शिक्षण अशा विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करून महाराष्ट्राच्या भरभराटीसाठी योगदान देणाऱ्या मान्यवरांचा सरपंच परिषद मुंबईच्या वतीने आदर्श पुरस्कार देऊन दरवर्षी सन्मान करण्यात येतो. याही वर्षी विविध पुरस्कार देण्यात येणार आहेत. यासाठी प्रस्ताव मागवण्यात आले आहेत. यशवंतराव चव्हाण आदर्श लोकप्रतिनिधी पुरस्कारासाठी राज्यातील विधानसभा व विधान परिषद सदस्य, उद्योग क्षेत्रातील पुरस्कारासाठी ग्रामीण व शहरी भागातील उद्योजक, आदर्श ग्रामपंचायतीसाठी राज्यातील उत्कृष्ट कार्य केलेल्या ग्रामपंचायती, आदर्श ग्रामपंचायत अधिकारी यासाठी ग्राम पंचायत अधिकाऱ्यांनी, उत्तम प्रशासक या पुरस्कारासाठी प्रशासकीय सेवेतील अधिकाऱ्यांनी, समाजसेवेत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या समाजसेवकांनी, आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी शिक्षक, शिक्षिका, प्राध्यापक, प्राध्यापिका आणि आदर्श सरपंच, उपसरपंच पुरस्कारासाठी सरपंच उपसरपंच यांनी आपले प्रस्ताव ३० जून २०२५ पर्यंत असे आवाहन सरपंच परिषदेचे प्रदेशाध्यक्ष दत्ता काकडे यांनी केले आहे.

पुरस्काराचे वितरण यशवंतराव चव्हाण ज्ञान प्रबोधनी यशोदा राजभवन पुणे येथे पद्मश्री पोपटराव पवार आणि मंत्र्यांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात येतील, अशी माहिती ही सरपंच परिषदेच्यावतीने देण्यात आली आहे.

# मगनपुरा येथील सदिच्छा सोनी पाटील यांचा भाजपात प्रवेश



**नांदेड (प्रतिनिधी)–** मगनपुरा नवा मोंढा भागातील सदिच्छा सोनी पाटील यांनी पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते, माजी मुख्यमंत्री तथा भाजपा नेते खासदार अशोकराव चव्हाण यांच्या मार्गदर्शनात अनेक महिला कार्यकर्त्यांसह भारतीय जनता पार्टीत पक्षप्रवेश केला.

यावेळी आमदार राजेश पवार, आमदार तुषार राठोड, भाजपाचे संघटनमंत्री संजय कौडगे, जिल्हाध्यक्ष डॉ. संतुक हंबर्डे, ॲड. किशोर देशमुख, महानगर अध्यक्ष अमर राजुरकर यांच्यासह भाजप नेत्यांची उपस्थिती होती.

यावेळी बोलताना सदिच्छा सोनी पाटील म्हणाल्या की, देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकासात्मक नेतृत्वावर विश्वास ठेवत आपण भाजपमध्ये प्रवेश केला असून येणाऱ्या काळात पक्षाची ध्येयधोरणे व पक्षाचे कार्यक्रम तळागाळातील शेवटच्या घटकांपर्यंत पोहोचण्याचा आपला प्रयत्न राहील.

# गोवंश हत्याबंदी कायद्यांतर्गत पुन्हा मुखेड पोलिसांकडून १४ गोवंशांना जीवदान, चार जणांना अटक



**नांदेड (प्रतिनिधी)–** राज्यात गोवंश हत्याबंदी कायद्यानंतर राज्याने गोमातेला राजमाता म्हणून दर्जा दिला. तरीही गोवंशाची कत्तल करणे सुरूच आहे. अशाच अवैध कत्तलीसाठी जाणाऱ्या गोवंशांची मुखेड पोलिसांनी कारवाई करून सुटका केली. यावेळी पोलिसांनी चार जणांना अटक करून एक वाहन जप्त केले आहे.

पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी पो.स्टे. हद्दीतील जनावरे अवैध प्रकारे कत्तलीसाठी वाहतूक करणारे इसमांवर कारवाई करण्याचे जिल्ह्यातील सर्व ठाणेदारांना आदेश दिले होते.

त्या अनुषंगाने दि. १२ जून रोजी अवैध धंद्याची माहिती काढून केसेस करणे कामी मुखेडचे पोलीस निरीक्षक लक्ष्मण केंद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्या पथकाने पोलीस ठाणे हद्दीत गस्त सुरू केली. अवैध धंद्याची माहिती काढत सलगरा येथे पथक आले असता गुप्त माहितीवरून त्यांनी कारवाई केली. त्यावेळी बेटमोगरा येथे मोहीद्दीन अब्दुलसाब कुरेशी, इजाज बाबू कुरेशी, अमीर बाबू कुरेशी, नय्यूम अजमोद्दीन कुरेशी सर्व रा. बेटमोगरा ता. मुखेड यांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून अवैध गायी व कालवडी बाहेर राज्यात नेवून कत्तलीच्या उद्देशाने विक्री करण्यासाठी त्यांच्या घराच्या पाठीमागे बांधून ठेवलेल्या होत्या त्या जप्त केल्या. चार गायी व दहा कालवड (ज्यांची किंमत १ लाख ९६ हजार रूपये) ज्यांना चारा पाणी न करता उपाशी ठेवलेल्या अवस्थेत मिळून आले. सदर जनावरांना ताब्यात घेवून गोशाळा, मुखेड येथे पाठविण्यात आले आहे. या प्रकरणी आरोपींविरूध्द पोलीस हवालदार बालाजी तेलंगे यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आले आहे.

# श्रीवेद संस्थेचा वर्धापन दिन उत्साहात साजरा




**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड शहरातील भागधारकांच्या, ठेवीदारांच्या आणि कर्जदारांच्या विश्वासास पात्र ठरलेल्या श्रीवेद मल्टीस्टेट को-ऑपरेटीव्ह क्रेडीट सोसायटी लि.नांदेड यांनी त्यांचा १० वा वर्धापन दिन उत्साहात साजरा केला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून संस्थेचे चेअरमन मारोतीराव कंठेवाड हे होते. वर्धापन दिनाच्या निमित्ताने नांदेड शहरातील शासकीय शल्य चिकित्सालयात जिल्हा शल्य चिकित्सक म्हणून नुकतेच संजयजी पेरके हे रुजू झाले आहेत. त्यांना जिल्हा शल्य चिकित्सक म्हणून बढती मिळाली आहे. या प्रसंगी त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. तसेच बालाजीराव कंठेवाड यांना महाराष्ट्र सरकार मार्फत सोलार उभारणीचे भव्य असे कॉन्ट्रॅक्ट मिळाले आहे, म्हणून त्यांचाही योग्य तो सत्कार करण्यात आला. त्याचप्रमाणे मन्नेरवारलू समाजातील एक होतकरू विद्यार्थी वेदांत मारोतीराव कंठेवाड या मुलाने जेईई मेन या परीक्षेत भारतातून १५८ वा रँक आणि जेईई ॲडव्हाँस भारतातून ३३९ वा रँक मिळाला आणि आयआयटी वाराणसी कॉलेजसाठी तो पात्र झाला आहे. याबद्दल वेदांत कंठेवाड यांचा सत्कार करण्यात आला. गिरोड यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला आणि प्रभावी असे सूत्रसंचालन केले.

श्रीवेद मल्टीस्टेट संस्थेच्या कार्यकारी संचालिका सविता मारोतीराव कंठेवाड यांनी या आपल्या विश्वासू संस्थेच्या यशस्वी १० वर्षांच्या प्रवासासाठी मन:पूर्वक अभिनंदन व शुभेच्छा व्यक्त केल्या. उपस्थितांना संस्थेच्या कार्याविषयी माहिती देऊन संस्थेविषयी ग्राहक, ठेवीदार आणि भागधारक यांचे मनात दिवसेंदिवस विश्वास वाढत चालल्याचे सांगितले.

सत्कार कार्यक्रमानंतर डॉ. संजयजी पेरके यांनी समायोचीत भाषण करून संस्था आणि संचालक मंडळ यांनी सत्कार केल्याबद्दल आभार व्यक्त केले. यानंतर संस्थेच्या काही ठेवीदार, कर्जदार आणि भागधारक यांनी संस्थेविषयी गौरवोद्गाराचे भाषण केले. तद्नंतर संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी एस.जी. चांडोळकर यांनी संस्थेच्या आर्थिक परिस्थितीची सविस्तर आकडेवारी सभेत सांगून कर्जदार सभासदांची गरज विचारात घेऊन आणि अर्थक्षमता तपासून कर्ज पुरवठा केला जात असल्याचे सांगितले. तसेच संस्थेच्या कामकाजाचा आढावा घेऊन फेडरेशन ऑफ मल्टीस्टेट ऑप-क्रेडीट सोसायटी यांचे मार्फत तीन वेळेस संस्थेस महाराष्ट्र पातळीवरील पुरस्कार प्राप्त झाले आहेत. यावरून संस्थेच्या पारदर्शी व्यवहाराची माहिती सर्व संबंधितांना झाली असल्याचे सांगून मागील दहा वर्षापासून संस्था कार्य करीत असल्याचे सांगितले.

याप्रसंगी संस्थेचे संचालक मोहनराव गोपुलवाड, नागोराव पडलवार, रामदास कांबळे तसेच ग्राहक जी.व्ही. पांडे, बालाजीराव इबितदार, गजानन मुधोळ पाटील, डॉ. अमृतवाड, पंढरीनाथ कंठेवाड, काजी समशोद्दिन, एम.एन. मिठेवाड, अमृतराव पेंटेवाड, ॲड. सुरेश चप्पलवार, वडजे, पेरके, ॲड. भवर, ॲड. जोंधळे, विनायक पाथरकर, नामदेव झंम्पलवाड, शर्मिलाताई कंठेवाड इत्यादी मान्यवर उपस्थित होते. संचालक नागनाथ अनंतवाड यांनी उपस्थितांचे आभार मानल्यानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

# चंदेरी



## शब्बीर अहलुवालियाची विशेष मुलाखत

# आयुष्य सोशल मीडियावर जगत नाही; आवश्यक तेवढे शेअर करा

**छोट्या पडद्यावर जवळजवळ २५ वर्षे काम करणारे सुप्रसिद्ध अभिनेता शब्बीर अहलुवालिया यांच्याकडे क्योंकी सास भी कभी बहू थी, कहीं तो होगा, कसौटी जिंदगी की आणि कुमकुम भाग्य अशा लोकप्रिय सिरियल आहेत. टीव्हीसोबतच अनेक चित्रपटांमध्ये काम केलेले शब्बीर हे क्रीडा क्षेत्रातील व्यक्तीदेखील आहेत. सध्या ते त्यांच्या उफ ये लव्ह है मुश्किल या नवीन टीव्ही शोमुळे चर्चेत आहेत. त्यांच्याशी केलेली बातचीत...**

**प्रश्न : तुम्ही सोशल मीडिया कसे हाताळता? तुमच्या वजन कमी करण्याबद्दल असो किंवा शोमधील तुमची सहकलाकार सुंबुल तौकीरसोबतच्या तुमच्या वयाच्या फरकाबद्दल असो, हे सर्व सोशल मीडियावर व्हायरल होत राहते...**

**» शब्बीर अहलुवालिया :** मी सोशल मीडियाकडे लक्ष देण्याऐवजी माझ्या कामावर आणि शोवर लक्ष केंद्रित करतो. जेव्हा जेव्हा मला माझ्या कामाशी किंवा स्वतःशी संबंधित कोणतीही माहिती द्यावी लागते, तेव्हा मी ते सोशल मीडियावर शेअर करतो. मी माझे आयुष्य सोशल मीडियावर जगत नाही. तुम्ही जितके जास्त सोशल मीडियाशी जोडले जाल तितके ते तुम्हाला त्रास देईल. मी म्हणेन की तुम्ही सोशल मीडियावर आवश्यक तेवढेच शेअर करा, अन्यथा तुम्ही त्यात बुडत राहाल. आजचे तरुण सोशल मीडियावर खूप सक्रिय आहेत. मुलांबद्दल बोलायचे झाले तर मला वाटते की त्यांनी तिथे असू नये. कारण ते त्यांच्या मानसिक आरोग्याला हानी पोहोचवू शकते.




**प्रश्न : तुम्ही जवळजवळ २५ वर्षांपासून टीव्ही इंडस्ट्रीमध्ये आहात, ओटीटीच्या आगमनानंतर टीव्हीचे आकर्षण कमी झाले आहे असे तुम्हाला वाटते का?**

**शब्बीर अहलुवालिया :** माझ्या मते, आज केवळ ओटीटीच नाही तर सोशल मीडिया देखील एक कारण आहे. आज प्रेक्षकांकडे भरपूर पर्याय आहेत. जर तुम्हाला प्रेक्षक तुमच्याशी जोडलेले ठेवायचे असतील तर तुम्हाला काहीतरी दमदार बनवावे लागेल. जेव्हा मी माझ्या कारकिर्दीला सुरुवात केली तेव्हा मनोरंजनाची इतकी साधने नव्हती. पण आज इंटरनेटमुळे संपूर्ण जग तुमच्या हातात आहे आणि काहीही दाखवण्यापूर्वी तुम्हाला खूप काळजी घ्यावी लागते. वेबच्या आगमनाने टीव्हीचे आकर्षण कमी झाले आहे असे मी म्हणणार नाही. मी असे म्हणेन की कंटेंटचा वापर बदलला आहे. वेब असो किंवा टीव्ही, आता शोसाठी कठोर परिश्रम करावे लागतात. पूर्वी फक्त एक शो बनवला जात असे, पण आता एक संपूर्ण कार्यक्रम बनवला जातो, जिथे शोच्या प्रत्येक तपशीलावर काम केले जाते. पण त्याच वेळी, मी हे देखील सांगू इच्छितो की हा एक अतिशय रोमांचक काळ आहे. वेगवेगळ्या प्रकारच्या कथा बनवल्या जात आहेत आणि अनेक नवीन प्रतिभांनाही संधी मिळत आहे.

**प्रश्न : गेल्या काही वर्षांपासून, तुम्ही काम आणि कुटुंबाचा समतोल साधत आहात. अभिनयासारख्या आव्हानात्मक व्यवसायात असताना तुम्ही हे कसे करता?**

**शब्बीर अहलुवालिया :** मला माझ्या कुटुंबासोबत वेळ घालवायला आवडते. मुलांसोबत आणि पत्नीसोबत सुट्टीवर जाणे, खेळणे, खाणे-पिणे आवडते. माझी दोन्ही मुले खूप गोंडस आहेत. मला खेळात खूप रस आहे. म्हणून माझ्याकडे कितीही काम असले तरी मी या गोष्टींसाठी वेळ काढतो. कधीकधी जेव्हा मी कामात खूप व्यस्त असतो, तेव्हा संधी मिळताच मी माझ्या कुटुंबाला भरपूर वेळ देऊन त्याची भरपाई करतो.

**प्रश्न : कांची कौलसारख्या अभिनेत्री पत्नीच्या सहवासाने तुम्हाला कशी मदत केली?**

**शब्बीर अहलुवालिया :** कांची माझे जीवन आहे, माझ्या आयुष्यातील प्रेम. ती एक परिपूर्ण पत्नी आहे, एक परिपूर्ण आई आहे. माझे आयुष्यात तिचे असणे मी देवाचा आशीर्वाद मानतो. आमच्या अनेक समान आवडी आहेत. आम्ही खूप चांगले जुळवून घेतो. शूटिंग संपताच मी घरी धावतो.

**साहसी खेळांसाठी गिनीज वर्ल्ड रेकॉर्डमध्ये तुमचे नाव देखील समाविष्ट आहे का?**

**शब्बीर अहलुवालिया :** अभिनेता असण्याव्यतिरिक्त, मी एक क्रीडा व्यक्ती देखील आहे. मला साहसी खेळ खूप आवडतात. वर्षांपूर्वी, जेव्हा मला आगीतून सर्वात लांब मोटारसायकल चालवण्याची संधी मिळाली, तेव्हा मी त्यात




भाग घेतला आणि ते घडले. मला खेळांबद्दल खूप आवड आहे. खरे सांगायचे तर, मी विक्रम करू शकेन की नाही हे माझ्या मनात कधीच येत नाही. मला खेळांबद्दल आवड आहे, म्हणूनच मी भाग घेतो. जेव्हा तुम्ही निर्भय असता तेव्हा तुम्ही अजिंक्य बनता. तथापि, धोकादायक खेळांमुळे माझे अनेक अपघात देखील झाले आहेत. मी अनेक वेळा माझी हाडे मोडली आहेत. परंतु आता मी अपघातांपासून दूर राहतो. आता मी योगा, कार्डिओ आणि वर्कआउट करून माझी शक्ती आणि आरोग्य मजबूत करण्यावर विश्वास ठेवतो. पण मी माझ्या मुलांना पडण्यापासून रोखत नाही. मला विश्वास आहे की ते फक्त पडल्यानेच मजबूत होतील.

**प्रश्न : टेलिव्हिजनवर अनेकदा मागासलेला कंटेंट असल्याचा आरोप केला जातो, तुमचा अलीकडील शो उफ्फ ये लव्ह है मुश्किल किती वेगळा आहे?**

**शब्बीर अहलुवालिया :** मी म्हणेन की टीव्हीवर सर्व प्रकारचे कंटेंट आहे. जर रिग्रेसिव शो बनवले जातात, तर प्रोग्रेसिव शोदेखील बनवले जातात. कारण आज आपल्याकडे सर्व प्रकारचे प्रेक्षक आहेत. ज्या दिवशी प्रेक्षक असे शो पाहणे बंद करतील, त्या दिवशी ते बनणे बंद होतील. बऱ्याच वेळा, त्याच शोमध्ये मागासलेपणासह एक प्रगतीशील कथा दाखवली जाते. आमचा शो पारंपरिक मेलोड्रामापेक्षा वेगळा आहे. तो प्रत्येक वर्गातील प्रेक्षकांना आकर्षित करेल. तो नातेसंबंधांची गुंतागुंत आणि भावनिक गोंधळाचे चित्रण करतो. माझ्या युग सिन्हा या पात्रासाठी मी १४ किलो वजन कमी केले. माझ्या पात्रात अनेक स्तर आहेत, जे मला साकारण्यात खूप आनंद झाला.

## ५७ व्या वर्षी अरबाज खान होणार बाबा!

**बॉलीवूड अभिनेता अरबाज खान त्याच्या वैयक्तिक आयुष्यामुळे पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. वयाच्या ५७ वर्षी अरबाज खान बाबा होणार आहे. त्याची दुसरी पत्नी शुरा लवकरच आई होणार आहे. शुरा त्याच्यापेक्षा जवळपास २२ वर्षांनी लहान आहे. हे दोघंही क्लिनिक बाहेर एकत्र दिसल्याने शुरा गरोदर असल्याच्या चर्चा रंगल्या होत्या. आता अभिनेत्याने स्वतः पत्नी शुरा खान आई होणार असल्याची आनंदाची बातमी सर्वांबरोबर शेअर केली आहे.**



अरबाजचं पहिलं लग्न मलायका अरोराशी झालं होतं. या दोघांच्या मुलाचं नाव अरहान खान आहे. १९ वर्षांच्या संसारानंतर अरबाज-मलायकाचा घटस्फोट २०१७ मध्ये झाला. यानंतर डिसेंबर २०२३ मध्ये अरबाजने शुरा खानशी लग्न केलं. शुरा गरोदर असल्याबद्दल प्रश्न विचारला असता अभिनेता म्हणाला, की हो हे खरं आहे आणि हा आमच्या आयुष्यातील खास क्षण आहे. मी प्रचंड आनंदी आहे. यामुळेच मला नव्याने जबाबदारीची जाणीव होत आहे. आम्हा दोघांचे कुटुंबीय सुद्धा ही गोड बातमी ऐकून प्रचंड आनंदी झाले. आमच्या आयुष्यात येणाऱ्या या नव्या पाहुण्याच्या स्वागतासाठी आम्ही सज्ज झालो आहोत. मी थोडा नर्व्हस आहे आणि या क्षणाला कोणीही नर्व्हस होईल. कारण, अनेक वर्षांनी मी पुन्हा एकदा 'फादरहूड' अनुभवणार आहे. ही गुडन्यूज समजल्यापासून माझ्यात जबाबदारीची भावना निर्माण झाली आहे. आता मी भविष्यात कसा बाबा होईन हे माहिती नाही. पण, इतकं नक्की सांगेन की आजच्या काळात चांगले आई-बाबा, चांगला पालक होणं आवश्यक आहे. जे आपल्या बाळावर प्रेम करतील, त्याच्यावर सदैव लक्ष देतील, त्याची काळजी घेतील आणि आपल्या मुलाला सगळ्या चांगल्या गोष्टी देण्याचा प्रयत्न करतील आणि मलाही हेच करायचं आहे, असं अरबाजने सांगितलं. अरबाजची दुसरी पत्नी शुरा ही मेकअप आर्टिस्ट आहे. आता वयाच्या ३५ व्या वर्षी शुरा आई होणार आहे. अरबाज-शुराचं लग्न २०२३ च्या अखेरिस झालं होतं. या दोघांच्या लग्नाला सलमान खान कुटुंबीय व बॉलीवूडचे मोजकेच सेलिब्रिटी उपस्थित होते. अरबाज-मलायकाचा मुलगा अरहान देखील या लग्नात हजर होता.

## म्हणून परेश रावल यांनी नाकारला चित्रपट!

'हेरा फेरी ३'मधून परेश रावल यांनी अचानक एक्झिट घेतल्याने सगळ्यांनाच आश्चर्याचा धक्का बसला आहे. परेश रावल यांच्या एक्झिटमुळे आता 'हेरा फेरी ३'मध्ये अक्षय कुमार, सुनील शेट्टी आणि बाबू भैयाचं त्रिकुट पाहायला मिळणार नाही. परेश रावल यांनी अचानक घेतलेल्या या निर्णयामुळे सिनेमाचे दिग्दर्शक प्रियदर्शन यांनाही धक्का बसला आहे. परेश रावल यांनी अचानक बाहेर पडल्याची घोषणा केल्यानंतर अनेक चाहत्यांची निराशाच झाली आहे. यानंतर अक्षय कुमारच्या निर्मित संस्थेकडून त्यांना कायदेशीर नोटीस पाठवण्यात आली होती. अक्षय कुमारच्या 'केप ऑफ गुड फिल्म्स' या निर्मिती संस्थेने परेश रावल यांच्यावर २५ कोटींचा दावा ठोकला होता. परेश रावल यांनी करारावर स्वाक्षरी करूनही 'हेरा फेरी ३' चित्रपटातून बाहेर पडले आणि यामुळे निर्मात्यांचं आर्थिक नुकसान झालं, असा दावा अक्षय कुमारच्या निर्मिती संस्थेकडून करण्यात आला होता. त्यावर परेश रावल यांनीही कायदेशीर उत्तर पाठवलं. पण, तुम्हाला माहीत आहे का परेश रावल यांनी अक्षयचा चित्रपट सोडण्याची ही पहिलीच वेळ नाही. याआधी परेश रावल यांनी अक्षय कुमारच्या 'ओएमजी २' चित्रपटातूनही माघार घेतली होती. हा अभिनेता २०१२ मध्ये आलेल्या 'ओएमजी', 'ओह माय गॉड' चित्रपटात होता. हा चित्रपट प्रेक्षकांना खूप आवडला आणि बॉक्स ऑफिसवर चांगली कामगिरी केली. २०२३ मध्ये जेव्हा चित्रपटाचा सिक्वेल 'ओएमजी २' प्रदर्शित झाला तेव्हा परेश रावल त्यात नव्हते. त्यांच्या जागी पंकज त्रिपाठीची निवड करण्यात आली. अभिनेत्याने सिक्वेलमध्ये भूमिका न करण्याचे कारण सांगितले होते. ते म्हणाले होते, मला स्क्रिप्ट आवडली नाही म्हणून मी त्याचा भाग होऊ इच्छित नव्हतो. मला सिक्वेलमधील पात्र आवडले नाही म्हणून मी ते स्वीकारण्यास नकार दिला. जर तुम्ही सिक्वेल बनवत असाल तर ते मुन्नाभाई एमबीबीएससारखे ठेवा. २०२३ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'ओह माय गॉड २'मध्ये पंकज त्रिपाठी आणि अक्षय कुमार यांनी प्रमुख भूमिका साकारल्या होत्या. 'ओएमजी २'ला रिलीज होण्यापूर्वी सेन्सॉर बोर्डाच्या प्रमाणपत्राबाबत अनेक अडचणी आल्या, तरीही तो वर्षातील सर्वाधिक कमाई करणाऱ्या हिंदी चित्रपटांपैकी एक बनला.

## अभिनेत्री कृती खरबंदाची मुलाखत

# एक्स बॉयफ्रेंडपासून सुटका मिळविण्यासाठी मी अभिनेत्री बनले!



दमदार अभिनयाने साउथ चित्रपटसृष्टी गाजवणारी अभिनेत्री कृती खरबंदा हिने शादी में जरूर आना, तैश आणि हाऊसफुल ४ सारख्या चित्रपटांमधून बॉलिवूडमध्येही ठसा उमटवला आहे. आता ती राणा नायडू २ या वेब सिरीजद्वारे ओटीटीमध्ये प्रवेश करणार आहे. यानिमित्ताने घेतलेली तिची विशेष मुलाखत....



### कोणतेही संकट मला मागे आणून शकत नाही...

राणा नायडू २ मधील आलिया ओबेरॉय हे पात्र तिच्या ओटीटी पदार्पणासाठी निवडण्याचे कारण विचारले असता कृती म्हणाली, आलिया ओबेरॉयचे अनेक गुण माझ्या स्वतःच्या आयुष्याशी जुळतात. आलिया ही एक अशी मुलगी आहे जी पुरुषांच्या जगात स्वतःचे नाव कमावण्याचा प्रयत्न करत आहे. ती मुलींना भेडसावणाऱ्या लिंगभेदाच्या समस्येशी लढत आहे. ती खूप प्रतिभावान आहे. तिच्यात खूप क्षमता आहे, पण एक महिला असल्याने, स्वतःचे स्थान निर्माण करणे तिला अवघड जात आहे. तिला माहीत आहे की तिची स्वप्ने साध्य करण्यासाठी तिला काय करावे लागेल, पण ती स्वतः डागही लागू देत नाही. जरी आलिया अधिक स्पष्टवक्ता, अधिक धाडसी आहे, मी तितकीशी नाही, परंतु तिच्या जशा महत्त्वाकांक्षा आहेत आणि तिचे स्वतःवर प्रेम आहे, तसेच माझेही आहे. माझ्यातही हे गुण आहेत की मला जे करायचे आहे ते करतेच. मी शेवटपर्यंत माझ्या स्वप्नांसाठी लढते. मी कधीही हार मानत नाही. मी ती १७ वर्षांची मुलगी होते, जिला बॉलीवूड इंडस्ट्रीबद्दल काहीही माहिती नव्हती. मी माझ्या एक्स बॉयफ्रेंडपासून सुटका मिळवण्यासाठी अभिनेत्री बनले. ब्रेकअपनंतरही तो मला सोडत नसल्याने मी बंगळुरू सोडले. मी २१ वर्षांची असताना माझ्या वडिलांचा संपूर्ण व्यवसाय सांभाळला आणि घर चालवण्याची संपूर्ण जबाबदारी माझ्यावर आली. मला सर्वांची काळजी घ्यावी लागत होती.

### कलाकारांना दोष देणे चुकीचे...

अलीकडेच, करण जोहर आणि अनुराग कश्यप सारख्या चित्रपट निर्मात्यांनी अभिनेत्यांच्या प्रचंड फीवर टीका केली होती आणि बॉलीवूड इंडस्ट्रीच्या वाईट स्थितीसाठी अभिनेत्यांना जबाबदार धरले होते. यावर कृती म्हणते, की मी स्वतःसाठी बोलू शकते आणि माझा असा विश्वास आहे की माझ्या पिढीतील कलाकार चित्रपटाचे बजेट वाढू नये याची खूप काळजी घेतात. चित्रपट संपल्यानंतर तुम्ही असे का बोलत आहात? तुम्ही साइन करता तेव्हा ते सांगा. चित्रपट चालला नाही तेव्हा असे का म्हटले जात आहे? तेही कोणाचेही नाव न घेता. हे बरोबर नाही, असे कृती म्हणाली.

### त्यांचे घाणेरडे हेतू बदलता येत नसतील तर स्वतःला बदला...

अलीकडेच, कृतीची राणा नायडू २ मधील सह-कलाकार सुरवीन चावला हिच्या अनेक अभिनेत्रींनी इंडस्ट्रीमध्ये कास्टिंग काउचचे कटू अनुभव शेअर केले. चित्रपटांचे सेट मुलींसाठी सुरक्षित ठिकाण कसे बनवता येतील? या प्रश्नावर कृती म्हणते, की मी माझ्या आयुष्याचा बराचसा भाग याबद्दल



विचार करण्यात घालवला आहे. कारण या क्षेत्रात येणाऱ्या प्रत्येकीसोबत अशी घटना कधी ना कधी घडतेच. मला अशा विचारसरणीच्या लोकांचा दृष्टिकोन कसा बदलायचा हे माहीत नाही. म्हणून मी स्वतःला खूप बदलले आहे. एक काळ असा होता जेव्हा मला माहीत होते की मला त्या मिटिंगसाठी जावे लागेल. पण मला ते योग्य वाटले नाही. मग माझ्या आईने एक गोष्ट सांगितली की बेटा, मला माहीत आहे की हे खूप दुःखद आहे, पण तुला स्वतःमध्ये हा बदल आणावा लागेल. जर तुला थोडेसेही वाटत असेल की तुझा गैरफायदा घेतला जाईल, तर ते सोडून दे. कदाचित हा योग्य मार्ग नसेल, पण अशा परिस्थितीतून बाहेर पडण्यासाठी मला स्वतःला खूप मजबूत बनवावे लागले. जेणेकरून कोणीही मला त्या परिस्थितीत आणू शकणार नाही. अर्थातच आता गोष्टी बदलत आहेत. अनेक मार्गदर्शक तत्त्वे लागू केली गेली आहेत. समित्या स्थापन केल्या गेल्या आहेत. परंतु तरीही तुम्हाला वाटते तितका बदल झालेला नाही. लोकांचा मार्ग बदलला आहे. कारण ते आता घाबरले आहेत, परंतु हेतू बदललेले नाहीत. आता ते अशा प्रकारे करतात की मी बाहेर जाऊन बोलले तर कोणी म्हणेल की यात काय चूक आहे?

# सोमवारपासून राज्यात नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात

## ‘शाळा प्रवेशोत्सवा’च्या माध्यमातून होणार विद्यार्थ्यांचे स्वागत

**मुंबई (प्रतिनिधी)–** पुढील शैक्षणिक वर्षाची सुरुवात विदर्भ वगळता इतर सर्व विभागांत सोमवार दि. १६ जून रोजी तर विदर्भात सोमवार दि. २३ जून २०२५ पासून होणार आहे. शाळा सुरू होण्याच्या पहिल्या दिवशी ‘शाळा प्रवेशोत्सवा’च्या माध्यमातून मान्यवरांच्या उपस्थितीत सर्व नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात येणार असल्याची माहिती शालेय शिक्षण विभागामार्फत देण्यात आली आहे.

शाळेची गुणवत्ता वृद्धींगत करण्यासाठी व मुलांची उपस्थिती वाढविण्याकरीता शालेय शिक्षण विभागामार्फत राज्यभर ‘शाळा प्रवेशोत्सव’ उपक्रम साजरा करण्यात येणार आहे. या उपक्रमांतर्गत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, सर्व मंत्री, राज्यमंत्री तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी, सर्व अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव यांना नजिकच्या शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळेमध्ये भेट देण्यासाठी कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले आहे. या माध्यमातून विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता, मोफत पाठ्यपुस्तके, मोफत शालेय गणवेश व इतर सोयी सुविधांचा आढावा घेण्यात येईल. तसेच शाळा व्यवस्थापन समिती, सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, नगरसेवक यांच्याशी चर्चा करुन विद्यार्थ्यांचा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळेत प्रवेश घेण्याकडे कल कसा वाढेल, यासाठी आवश्यक उपाययोजना सुचविण्यात येतील.

राज्यातील लोकप्रतिनिधींबरोबरच वरिष्ठ अधिकाऱ्यांनी शाळा सुरू होण्याच्या पहिल्या दिवशी शाळांना भेट द्यावी याबाबत मुख्य सचिव सुजाता सौनिक यांनी नुकताच आढावा घेतला. सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, महानगरपालिकांचे आयुक्त, जिल्हा स्तरावरील विविध विभागांचे अधिकारी यांनी शाळांना भेट देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत करावे. त्याचबरोबर शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी आणि शाळांच्या सर्वांगीण विकासासाठी उपाययोजना सूचवाव्यात, असे आवाहन त्यांनी केले.

विद्यार्थ्यांमध्ये संख्याज्ञान व कौशल्य विकसित करण्यासाठी राज्यात निपूण महाराष्ट्र अभियान राबविण्यात येत आहे. याअंतर्गत दुसरी ते पाचवीच्या वर्गातील किमान ७५ टक्के विद्यार्थ्यांना इयत्तेनुसार अध्ययन क्षमता प्राप्त करणे हे ध्येय आहे. या कार्यक्रमांतर्गत पालकांचा अपेक्षित प्रतिसाद मिळण्याकरिता शासनाचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव यांनी ‘शाळा प्रवेशोत्सव’ कार्यक्रमामध्ये पालकांशी हितगुज साधावे. तसेच सर्व अधिकाऱ्यांना दत्तक शाळा घेण्याबाबत जबाबदारी देण्यात आली आहे, त्यानुसार सचिवांनी देखील पुढाकार घेऊन राज्याची शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी सहकार्य करावे, अशी विनंती शालेय शिक्षण विभागाच्या प्रधान सचिव आय.ए.कुंदन यांनी केली आहे.


## जाहीर प्रगटन

मौजे कौठा ता.जि. नांदेड मनपा हद्दीतील शेत गट नंबर ७२ पैकी प्लॉट नंबर ३० साईज लांबी पुर्व- पश्चिम ३० फुट म्हणजे ९.१४ मीटर व रूंदी दक्षिण-उत्तर २० फुट म्हणजे ६.१० मीटर एकूण क्षे.६०० चौरस फुटाचा प्लॉट सौ.मिरा कचरू डोलारे रा.चनईरोड ता.अंबेजोगाई जि.बीड यांचेकडून सौ.माधुरी उद्ध-वराव घुले रा.सदनिका नंबर ४०६ अमृत रेसिडन्सी एस.जी. जी.एस महाविद्यालयासमोर विष्णूपुरी नांदेड यांनी विकत घेण्याचा सौदा केला असून बयाना म्हणून काही रक्कम दिली आहे.

प्लॉटची चुर्तसिमा खालील प्रमाणे

पुर्वेस- प्लॉट नंबर ३९, पश्चिमेस - १५ २० फुट रूंद रोड, दक्षिणेस- प्लॉट नंबर ३१, उत्तरेस- प्लॉट नंबर २९

तरी वरील प्लॉट बद्दल कोणाचा काही हक्क, उजर, दावा आक्षेप सरकारी किंवा निमसरकारी बोजा असेल त्यांनी आ-पला उजर/ आक्षेप हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्यावर सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या उजर आक्षेप ग्राहय धरल्या जाणार नाही व नंतर शेत जमिनीचे खरेदी खत करण्यात येईल. करीता हे जाहीर प्रगटन

**जाहीर प्रगटन देणार**

**सौ.माधुरी उद्धवराव घुले रा.सदनिका नंबर ४०६ अमृत रेसिडन्सी एस.जी.जी.एस महाविद्यालयासमोर विष्णूपुरी नांदेड मो.९६७३१४६५१०**

## जाहीर प्रगटन

सर्व जतनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे सुचीत करण्यात येते की, आमचे पक्षकार १. नंदकुमार लक्ष्मणराव गोविंदवार २. शिवप्रसाद बालाजीराव लखपत्रे रा.हिमायतनगर ता.हिमायतनगर जि.नांदेड यांनी रामदास देवराव माने रा.बोरी ता.उमरखेड जि.यवतमाळ यांच्या मालकी व ताब्यातील मौजे हिमायतनगर ता.हिमायतनगर जि.नांदेड हद्दीतील गट नंबर १८/१ एकूण क्षे.१ हेक्टर ०० आर आकार २.१८ पैसे शेत जमिन ज्याची एकत्रित चुर्तसिमा खालील प्रमाणे

पुर्वेस- गयाबाई देवराव माने, पश्चिमेस - सकरगे साहेब, दक्षिणेस- बोरी- हिमायतनगर रोड, उत्तरेस- तुप्तेवार यांचे शेत चर्तुसिमेच्या आतील शेत जमिन वरील लिहून घेणार यांनी खरेदी करण्याचा कराचा करार केला असून इसारा रक्कम अदा करण्यात आलेली आहे. आणि लवकरच आमचे पक्षकार वरील मालमत्तेची खरेदी खत करून घेणार आहेत. तरी वरील शेत जमिनीबाबत कोणाला काही आक्षेप, उजरदारी असल्यास त्यांनी सदर जाहीर प्रगटन प्रकाशित झाल्यापासून १५ दिवसाच्या आत आमच्याकडे येवून रितसर लेखी उजर व आक्षेप सादर करावा.मुदतीनंतर आमचे पक्षकार ठरलेला व्यवहार पुर्ण करून घेतील व त्यानंतर आलेल्या उजरदारीस व आक्षेपास कुठलाही अर्थ राहणार नाही याची नोंद घ्यावी.

करीता हे जाहीर प्रगटन

**मार्फत** **जाहीर प्रगटन देणार**

**ॲड.डि.एस.पंदलवाड** **१.नंदकुमार लक्ष्मणराव गोविंदरवार**

**२.शिवप्रसाद बालाजीराव लखपत्र**

**राजर्षी शाहू जिल्हा परिषद शिक्षक सहकारी पतसंस्था म.लोहा**

## जाहीर प्रगटन/जाहीर आवाहन

या जाहिर प्रगटनाद्वारे राजर्षी शाहू जिल्हा परिषद शिक्षक सहकारी पतसंस्था म.लोहा ता.लोहा जि.नांदेड या संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, मा.तालुका सहकारी निवडणूक अधिकारी तथा सहायक निबंधक , सहकारी संस्था ता.लोहा जि.नांदेड यांचे पत्र दिनांक १९/५/२०२५ अन्वये संस्थेच्या संचालक मंडळाच्या निवडणूकीसाठी संस्थेची दिनांक १/४/२०२५ या अर्हता दिनांकावरील मतदार यादी सादर करणे बाबत कळविण्यात आलेले आहे.

त्याअनुषंगाने ज्या सभासदांचे अपूर्ण शेअर्स आहेत व ज्या सभासदांकडे संस्थेच्या कर्जाची थकबाकी आहे त्यांनी सदरील जाहीर प्रगटनाच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत संस्थेची थकबाकी व अपुर्ण शेअर्स भरणा करण्यात यावा.जेणेकरून आपले नाव संस्थेच्या मतदार यादरीत समाविष्ठ करण्यात येईल.संस्थेने दिलेल्या विहीत मुदतीत जे सभासद संस्थेची थकबाकी अथवा अपुर्ण शेअर्सचा भरणा करणार नाहीत त्यांची नावे संस्थेच्या मतदार यादीत समाविष्ट करण्यात येणार नाहीत याची सर्व सभासदांनी नोंद घ्यावी व त्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील याची नोंद घ्यावी.

**चेअरमन/सचिव**

**राजर्षी शाहू जिल्हा परिषद शिक्षक सहकारी पतसंस्था म.लोहा**

**यशवंतराव चव्हाण शिक्षक सहकारी पतसंस्था म.नांदेड ता.जि.नांदेड**

## जाहीर प्रगटन/जाहीर आवाहन

या जाहिर प्रगटनाद्वारे यशवंतराव चव्हाण शिक्षक सहकारी पतसंस्था म.नांदेड ता.जि.नांदेड या संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, मा.तालुका सहकारी निवडणूक अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था नांदेड यांचे पत्र दिनांक ८/५/२०२५ अन्वये संस्थेच्या संचालक मंडळाच्या निवडणूकीसाठी संस्थेची दिनांक १/१/२०२५ या अर्हता दिनांकावरील मतदार यादी सादर करणे बाबत कळविण्यात आलेले आहे.

त्याअनुषंगाने ज्या सभासदांचे अपूर्ण शेअर्स आहेत व ज्या सभासदांकडे संस्थेच्या कर्जाची थकबाकी आहे त्यांनी सदरील जाहीर प्रगटनाच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत संस्थेची थकबाकी व अपुर्ण शेअर्स भरणा करण्यात यावा.जेणेकरून आपले नाव संस्थेच्या मतदार यादरीत समाविष्ठ करण्यात येईल.संस्थेने दिलेल्या विहीत मुदतीत जे सभासद संस्थेची थकबाकी अथवा अपुर्ण शेअर्सचा भरणा करणार नाहीत त्यांची नावे संस्थेच्या मतदार यादीत समाविष्ट करण्यात येणार नाहीत याची सर्व सभासदांनी नोंद घ्यावी व त्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील याची नोंद घ्यावी.

**प्रशासक**

**यशवंतराव चव्हाण शिक्षक सहकारी पतसंस्था म.नांदेड ता.जि.नांदेड**

## जाहीर प्रगटन

मौजे असदवन ता.जि. नांदेड हद्दीतील शेत गट नंबर १२९ प्लॉट नंबर ११ साईज एकूण क्षे.१६४६ चौरस फुटाचा प्लॉट बालाजी शिवराम पडगी रा.विळेगाव ता.धर्माबाद जि.नांदेड यांचेकडून संभाजी प्रल्हाद वर्ताळे रा.बाबानगर नांदेड यांनी विकत घेण्याचा सौदा केला असून बयाना म्हणून काही रक्कम दिली आहे.

प्लॉटची चुर्तसिमा खालील प्रमाणे

पुर्वेस- प्लॉट नंबर १२, पश्चिमेस - प्लॉट नंबर १०, दक्षिणेस- गट नंबर १२९ चा भाग, उत्तरेस- ९ मीटर रूंद रोड

तरी वरील प्लॉट बद्दल कोणाचा काही हक्क, उजर, दावा आक्षेप सरकारी किंवा निमसरकारी बोजा असेल त्यांनी आ-पला उजर/ आक्षेप हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्यावर सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या उजर आक्षेप ग्राहय धरल्या जाणार नाही व नंतर शेत जमिनीचे खरेदी खत करण्यात येईल. करीता हे जाहीर प्रगटन

**जाहीर प्रगटन देणार**

**संभाजी प्रल्हाद वर्ताळे रा.ओमसाई निवास बाबानगर नांदेड मो.९८२२६३८८२७,९८२२४३०५४९**

## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे


डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रॅडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा

डॉग डिलर

मोबाईल नंबर

९८५०६८८५२८



## जिजामाता महिला ग्रामिण विकासमंडळ चौंडी संचलित

## जिजामाता मागासवर्गीय मुलींचे वसतीगृह,

### माळाकोळी ता.लोहा जि.नांदेड

### प्रवेश देणे चालू आहे.

शैक्षणिक वर्षे वर्ष २०२५-२६ मध्ये इयत्ता ५ ते १० वी च्या वर्गात शिक्षण घेत असलेल्या गरजू विद्यार्थीनीना प्रवेश देणे चालू आहे.

| अ.क्र. | जातीचा प्रकार | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | अनुसुचीत जाती | ६७ टक्के |
| २ | अनुसुचीत जमाती | १४ टक्के |
| ३ | विमुक्त जाती व भटक्या जमाती | १५ टक्के |
| ४ | विशेष मागासवर्ग | २ टक्के |
| ५ | इतर मागासवर्ग | १५ टक्के |
| ६ | आर्थिक दृष्टया दुर्बल घटक(खुला) | ५ टक्के |

**आमची वैशिष्टये–** भव्य व सुसज्य इमारत, मोफत निवास व जेवणाची उत्तम सोय, खेळासाठी प्रस्तत क्रिडागंण, फिल्टर पाणी सुविधा, हवेशीर खोल्याची व्यवस्था,नळाद्वारे व बोर द्वारे पाणी, लाईट व पंख्याची सोय, गरम पाण्याची सोय

**अधिक्षक** **सचिव**

**जिजामाता मागासवर्गीय मुलींचे वसतीगृह, माळाकोळी ता.लोहा जि.नांदेड मो.९०४९२८५५७९**

**कै.गयाबाई एज्युकेशन सोसायटी एकदरा संचलीत**

## आदर्श विद्यार्थी वसतीगृह सांगवी ता.जि.नांदेड

### मोफत प्रवेश देणे चालू आहे.

प्रवेशासाठी शैक्षणिक पात्रता- चालू शैक्षणिक वर्षे वर्ष २०२५-२६ साठी इयत्ता ५ ते १० वी च्या विद्यार्थ्यांसाठी जातीनिहाय टक्केवारी नुसार मोफत प्रवेश देणे चालू आहे.

| अ.क्र. | जातीचा प्रकार | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | अनुसुचीत जाती | ६७ टक्के |
| २ | अनुसुचीत जमाती | १४ टक्के |
| ३ | विमुक्त जाती व भटक्या जमाती | १७ टक्के |
| ४ | विशेष मागासवर्ग | २ टक्के |
| ५ | इतर मागासवर्ग | १५ टक्के |
| ६ | आर्थिक दृष्टया दुर्बल घटक(खुला) | ५ टक्के |

**आमची वैशिष्टये–** भव्य व सुसज्य इमारत, मोफत निवास व जेवणाची उत्तम सोय, बिछान्याची सोय तसेय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीकडे अधिकक्षकांचे विशेष लक्ष तरी वरील प्रवर्गातील जातीच्या गरजू व होतकरून पालकांनी आपल्या पाल्याचा प्रवेश निश्चित करावा.

**संचालक**

**आदर्श विद्यार्थी वसतीगृह सांगवी ता.जि.नांदेड**

**मो.७८८८१८४०७८**

**संपर्क नंबर -७६६६०९१२७८**

**९५२७९६४१२९**

**शासन मान्य**

**जगजीवनराम विद्यार्थी वसतिगृह मगनपुरा नांदेड**

## प्रवेश देणे चालू आहे.

सन २०२५-२०२६ शैक्षणिक वर्षात स्थानिक विद्यालयात प्रवेश घेणाऱ्या इयत्ता ५ वी ते १० वी वर्गात शिकत असलेल्या गरजू विद्यार्थ्यांना प्रवेश देण चालू आहे.तरी खालीलप्रमाणे जातीनिहाय टक्केवारीनुसार प्रवेश देणे चालू आहे

| अ.क्र. | जातीचा प्रवर्ग | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | अनुसुचीत जाती (एस.सी) | १४- ६७ टक्के |
| २ | अनुसुचीत जमाती (एस.टी) | ३- १४ टक्के |
| ३ | वि.जा./भ.ज./व्ही.जे./एन.टी | ३- १७ टक्के |
| ४ | इतर मागासवर्गीय | ३- १५ टक्के |
| ५ | ओपन खुला | १- ७५ टक्के |
| | एकूण | २४-१०० टक्के |

**नोट :** मोफत प्रवेश,सुसज्ज इमारत, तज्ञ शिक्षकांच्या मार्फत मुलांची प्रगती करून घेणे, भोजनाची उत्तम व्यवस्था, अंथरूण पांघरूण,प्लेट वाटी व पेटीची सोय, **टिप**.प्रवेशासाठी अर्ज सादर करण्याची शेवटची तारीख १५ जून २०२३ पर्यंत

**संचालक**

**जगजीवनराम विद्यार्थी वसतिगृह मगनपुरा नांदेड**

**मो.९९७५२७०७४१**

## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस व संबंधीतांना सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार डॉ.गजानन अशोकराव अंबेकर व इतर रा.कंधार यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरून हे जाहीर प्रगटन देण्यात येत आहे, हे की, माझे पक्षकार यांनी श्री युक्रांद भानूदास देशपांडे व देवदत्त भानूदास देशपांडे रा.विकासनगर कौठा यांच्या मालकी ताब्यातील शेती मौज उमरज ता.कंधार जि.नांदेड येथील शेत गट नंबर १४ मधील २ हेक्टर १९ आर युक्रांद देशपांडे यांच्या मालकीची १ हेक्टर १० आर व देवदत्त देशपांडे यांच्या मालकीची १ हेक्टर ९ आर दोघांची मिळून २ हेक्टर १९ आर शेती माझे पक्षकार यांनी विकत घेण्याचा करार केला असून बयाना पोटी काही रक्कम दिली आहे.उर्वरीत रक्कम देवून खरेदी खत करण्याचे ठरले आहे. हे की, वरील शेती बाबत कोणाचा उजर,आक्षेप, हितसंबंध,कर्ज बोजा, वारसा इत्यादी असल्यास संबंधीतांनी आपला आक्षेप लेखी स्वरूपात मुळ कागदपत्रासह खालील पत्यावर आक्षेप नोंदवावा. मुदतीनंतर आलेला आक्षेप माझ्या पक्षकारास बंधनकारका राहणार नाही.माझे पक्षकार रितसर खरेदी खत करून घेतील करीता हे जाहीर प्रगटन.

**मार्फत** **जाहीर प्रगटन देणार**

**ॲड.भगवान शिंदे** **१.डॉ.गजानन अशोकराव अंबेकर व इतर**

**मो.८३२९३६७२०१** **२.सौ.वसुधा गजानन अंबेकर**

## Change In Name

My old Name is SUNIL DIGAMBERRAO UCHALE which now I am Changing as New Name SUNIL DIGAMBARRAO UCHALE Hence forth My All Correspondence will be done as per my new name. Please consider the same,

SIGN BY -SUNIL DIGAMBARRAO UCHALE C/O DIGAMBARRAO UCHALE H.N.1-9-299 NANDANVAN VIVEK NAGAR TARODA BK POST TARODA BK DIST NANDED MAHARASHTRA 431605 MO.7020736536

## टी.सी.हरवली

माझी पुजा नरसिंग दारेवाड या नावाची ९ पास टि.सी.शिवाजीनगर ते लेबर कॉलनी ऑटो प्रवास करीत असतांना हरवली आहे. कोणाला सापडल्यास खालील पत्यावर संपर्क साधावा--**संपर्क पत्ता- पुजा नरसिंग दारेवाड रा.चौफाळा नांदेड मो.९३५६२६८२७४**

### आधार फाउंडेशन नांदेड संचलित

## वैभव मैत्री मागासवर्गीय मुलांचे वसतीगृह गणेशनगर रोड नांदेड ता.जि.नांदेड

### मोफत प्रवेश देणे चालू आहे.

प्रवेशासाठी शैक्षणिक पात्रता- चालू शैक्षणिक वर्षे वर्ष २०२५-२६ साठी इयत्ता ५ ते १० वी च्या विद्यार्थ्यांसाठी जातीनिहाय टक्केवारी नुसार वैभव मैत्री मागासवर्गीय मुलांचे वसतीगृह गणेशनगर रोड नांदेड येथे मोफत प्रवेश देणे चालू आहे.

| अ.क्र. | जातीचा प्रकार | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | अनुसुचीत जाती | ६७ टक्के |
| २ | अनुसुचीत जमाती | १४ टक्के |
| ३ | विमुक्त जाती व भटक्या जमाती | १७ टक्के |
| ४ | विशेष मागासवर्ग | २ टक्के |
| ५ | इतर मागासवर्ग | १५ टक्के |
| ६ | आर्थिक दृष्टया दुर्बल घटक(खुला) | ५ टक्के |

**आमची वैशिष्टये–** भव्य व सुसज्य इमारत, मोफत निवास व जेवणाची उत्तम सोय, बिछान्याची सोय तसेय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीकडे अधिकक्षकांचे विशेष लक्ष तरी वरील प्रवर्गातील जातीच्या गरजू व होतकरून पालकांनी आपल्या पाल्याचा प्रवेश निश्चित करावा.

**सचिव**

**वैभव मैत्री मागासवर्गीय मुलांचे वसतीगृह गणेशनगर रोड नांदेड मो.९५४५५५७१११**

**संपर्क नंबर -७६६६०९१२७८**

**९५२७९६४१२९**

### आधार फाउंडेशन नांदेड संचलित

## कुमार छात्रालय राहुल कॉलनी तरोडा ता.जि.नांदेड

### मोफत प्रवेश देणे चालू आहे.

प्रवेशासाठी शैक्षणिक पात्रता- चालू शैक्षणिक वर्षे वर्ष २०२५-२६ साठी इयत्ता ५ ते १० वी च्या विद्यार्थ्यांसाठी जातीनिहाय टक्केवारी नुसार कुमार छात्रालय राहूल कॉलनी तरोडा नांदेड येथे मोफत प्रवेश देणे चालू आहे.

| अ.क्र. | जातीचा प्रकार | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | अनुसुचीत जाती | ६७ टक्के |
| २ | अनुसुचीत जमाती | १४ टक्के |
| ३ | विमुक्त जाती व भटक्या जमाती | १७ टक्के |
| ४ | विशेष मागासवर्ग | २ टक्के |
| ५ | इतर मागासवर्ग | १५ टक्के |
| ६ | आर्थिक दृष्टया दुर्बल घटक(खुला) | ५ टक्के |

**आमची वैशिष्टये–** भव्य व सुसज्य इमारत, मोफत निवास व जेवणाची उत्तम सोय, बिछान्याची सोय तसेय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीकडे अधिकक्षकांचे विशेष लक्ष तरी वरील प्रवर्गातील जातीच्या गरजू व होतकरून पालकांनी आपल्या पाल्याचा प्रवेश निश्चित करावा.

**सचिव**

**कुमार छात्रालय राहूल कॉलनी तरोडा नांदेड मो.९५४५५५७१११**

**संपर्क नंबर -७६६६०९१२७८**

**९५२७९६४१२९**

### आंबेडकरी चळवळीतील एक निस्वार्थ व्यक्तिमत्त्व तथा अखिल महाराष्ट्र शिक्षक संघटनेचे प्रदेश उपाध्यक्ष

# प्रभू सावंत



## यांच्या वाढदिवसानिमित्त हार्दिक मंगल कामना!

शुभेच्छुक–प्राचार्य आनंद चंद्रे, साहेबराव चौदंते, गंगाधर वडणे, प्रा. अविनाश नाईक, रविंद्र सोनकांबळे, अंकुश चित्ते, प्रा. शिवाजी भदरगे, प्रा. जे. पी. जाधव.

स्थलांतर
सिटी मॅक्स डिजिटल कलर
मो.7058766021,9422185282
गट्टूम मार्केट,पहिला मजला,
शिवाजी नगर,नांदेड

# गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...

किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308



## मनपा आराखडा बाबत ना. हेमंत पाटील यांनी घेतली उपमुख्यमंत्री शिंदे यांची भेट

**नांदेड (प्रतिनिधी) –** वाघाळा शहर महानगरपालिका शहराचा पुढील २५ वर्षांचा विकास आराखडा तयार करून प्राधिकरण करण्याकरिता बैठकीचे आयोजन करावे अशी मागणी शिवसेना मुख्यनेते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे ना. हेमंत पाटील यांनी केली. यावेळी आ. बाबुराव कदम कोहळीकर, आ. आनंदराव बोंढारकर यांची उपस्थिती होती.



मराठवाड्यात छत्रपती संभाजी नगर नंतर महत्वाचे शहर म्हणून नांदेड ओळखले जाते. सध्या नांदेड शहराची लोकसंख्या १० लक्ष झाली असल्यामुळे महानगरपालिकेची हद्द वाढविणे गरजेचे आहे. शहराच्या आजूबाजूस २० किमीपर्यंत मोठ्या प्रमाणात प्लॉटिंग होत असून, त्या ठिकाणी कोठेही नगरविकास खात्याच्या नियमाप्रमाणे रस्ते सोडलेले नाहीत. पार्किंगकरिता मोकळ्या जागा नाहीत, खेळाचे मैदान व बगीचे याकरिता नियमानुसार जागा राखीव ठेवलेल्या नाहीत. त्यामुळे शहराच्या आजूबाजूच्या परिसरात एक मोठे खेडे तयार झाल्यासारखे वातावरण होत आहे. त्याचबरोबर ठिकठिकाणी अनिर्बंध बांधकामे होत असून त्यामुळे नांदेड शहर हे विद्रुप झालेले आहे. पूर्वीपासून नांदेड शहराची ऐतिहासिक शहर म्हणून ओळख आहे. त्यास या बाबींमुळे गालबोट लागत आहे. यापूर्वी सुद्धा नांदेडच्या शिष्टमंडळाने ना. हेमंत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली उपमुख्यमंत्री महोदयांची भेट घेतली होती. त्यावेळी सकारात्मक प्रतिसाद देत ना. एकनाथ शिंदे यांनी तात्काळ बैठक आयोजित करण्याच्या सूचना संबंधित विभागाला दिल्या होत्या. आज पुन्हा या संदर्भात भेट घेतली व पुढील २५ वर्षांचा विकास आराखडा तयार करण्यासाठी बैठक आयोजित करण्यात यावी, अशी मागणी केली.

## हातभट्टी विरोधातील कारवाईत नांदेड परिक्षेत्रात ७ लाखांचा मुद्देमाल जप्त

**नांदेड (प्रतिनिधी) –** पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांच्या आदेशावरून नांदेड परिक्षेत्रात हातभट्टीची दारू तसेच अवैध दारू वाहतूक विरोधात १४ जून रोजी मास रेड मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेंतर्गत एकूण १४१ गुन्हे दाखल करून ७ लाख २४ हजार ९९५ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.



नांदेड परिक्षेत्रातील नांदेडसह हिंगोली, परभणी व लातूर जिल्ह्यात ही कारवाई करण्यात आली. केवळ नांदेड जिल्ह्यात दारूबंदीची ६१ केसेस करून ७२७ लिटर हातभट्टीची दारू, ३२५० लिटर रसायन, देशी दारूच्या ६२२ बॉटल, विदेशी दारूच्या १४ बॉटल्स व १३९५ लिटर सिंधी जप्त करण्यात आली. ३ लाख ३६ हजार ८८० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

या चारही जिल्ह्यात एकूण ७ लाख २४ हजार ९९५ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर कारवाई पथकात परिक्षेत्रातील १३६ पोलीस अधिकारी व ४८७ अंमलदार सहभागी झाले होते.

## शाळांना भेटी उपक्रमांतर्गत लोकप्रतिनिधी व अधिकारी देणार शाळांना भेट

**नांदेड (प्रतिनिधी)-** शालेय शिक्षण विभागाच्या १०० शाळांना भेटी या विशेष उपक्रमाच्या अनुषंगाने जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी व अधिकारी येत्या १६ जून रोजी, शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या दिवशी स्वतःच्या मतदारसंघातील किंवा जवळच्या शाळेला भेट देतील. विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करून, शाळेतील शैक्षणिक गुणवत्ता, मूलभूत सुविधा व कामकाजाचा प्रत्यक्ष आढावा घेतला जाईल.

जिल्ह्यातील सर्व २ हजार १८५ जिल्हा परिषद शाळांमध्ये प्रवेशोत्सव राबविण्यात येणार असून, यंदा पहिल्यांदाच लोकप्रतिनिधी व वरिष्ठ अधिकाऱ्यांचा थेट सहभाग या उपक्रमाच्या माध्यमातून सुनिश्चित करण्यात आला आहे. यामुळे शाळा प्रशासन, पालक व स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये समन्वय वाढण्यास मदत होणार आहे.

जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी व शिक्षणाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली शाळा भेटींचे नियोजन करण्यात आले आहे. याप्रसंगी संबंधित लोकप्रतिनिधी शाळांना भेट देतील. नांदेड जिल्हयाचे पालकमंत्री अतुल सावे हे विष्णुपूरी येथील जि. प. हायस्कूल येथे भेट देणार आहेत. खा. रवींद्र चव्हाण हे जि. प. हायस्कूल घुंगराळा, खा. अशोक चव्हाण जि. प. हायस्कूल नूतन भोकर, खा. डॉ. अजित गोपछडे, जि. प. हायस्कूल लोहगाव, आ. प्रतापराव चिखलीकर जि. प. कें. प्रा. शाळा सोनखेड, आ. डॉ. तुषार राठोड जि. प. हायस्कूल कन्या शाळा मुखेड, आ. रोजश पवार, जि. प. हायस्कूल कुंटूर, आ. श्रीजया चव्हाण जि. प. हा. मुगट, आ. बालाजी कल्याणकर, जि. प. कें. प्रा. शाळा निळा, आ. हेमंत पाटील, जि. प. प्रा. शाळा पासदगाव, आ आनंदराव

### शाळेच्या पहिल्या दिवशी विशेष उपक्रम

इयत्ता पहिलीमध्ये नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे फुल देऊन स्वागत करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांची नोंदणी झाल्यानंतर त्यांना पुस्तक व पेन्सिलचे वाटप करण्यात येईल. स्मरणशक्तीवर आधारित बुद्धीचे खेळ आयोजित केले जातील. समुदाय आरोग्य अधिकारी यांच्या मार्फत विद्यार्थ्यांची उंची, वजन मोजणे आणि इतर प्राथमिक आरोग्य तपासण्या करण्यात येतील. प्रत्येक विद्यार्थ्याचा उजव्या हाताचा ठसा चार्ट पेपरवर घेऊन तो वर्गात लावण्यात येईल. प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांकडून स्मरणघडी पत्रिका भरून घेतली जाईल. ही पत्रिका २०३५ साली उघडून त्या दिवसाचे स्मरण करण्याचा संदेश दिला जाईल.

## नांदेड पोलीस दलातर्फे आदिवासी महिलांकरिता सायबर जनजागृती कार्यशाळा संपन्न

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्हा पोलीस प्रशासन आणि समाज यांचा एक घनिष्ट संबंध असतो. पोलिसांच्या कामकाज पद्धतीचा परिणाम समाजावर पडत असतो. पोलीस प्रशासन चोवीस तास समाजासाठी कार्यरत असतात. अशा वेळी दैनंदिन कामकाजाशिवाय सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवून विधायक कार्य करण्याकरिता पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या संकल्पना व मार्गदर्शनाखाली मिशन सहयोग ची सुरूवात करण्यात आली.




नाविन्यपूर्ण मिशन समाधान अंतर्गत दिनांक १३ जून रोजी जिल्ह्यातील किनवट येथील ग्रामीण भागातील आदिवासी महिला यांना सायबर जनजागृती उपक्रमासाठी मायक्रो फायनान्स यांनी सायबर सेलचे पोलीस उपनिरीक्षक मारोती चव्हाण यांना गेस्ट लेक्चरर म्हणून आमंत्रित करण्यात आले होते.

सदर कार्यशाळेत किनवट तालुक्यातील अंदाजे १५० आदिवासी व ग्रामीण भागातील महिलांनी सहभाग घेतला होता. सदर महिलांना पोउपनि मारोती चव्हाण व अंमलदार यन्नावार यांनी सायबर गुन्हयांचे प्रकार, सोशल मिडिया वापरताना घ्यावयाची काळजी, पासवर्ड सुरक्षितता, ऑनलाईन फसवणुक, डिजिटल फुटप्रिंट याबाबत उदाहरणांसह सविस्तर माहिती देण्यात आली.

## गांजाची विक्री व वाहतूक करणारे दोन आरोपी गजाआड

**लोहा (प्रतिनिधी) –** लोहा पोलीस ठाणे हद्दी अंतर्गत असलेल्या मौजे धर्मापुरी (मजरे) तांडा शिवारात अनधिकृत गांजाची विक्री व वाहतूक करण्याच्या तयारीत असलेल्या दोन आरोपींना गांजा आणि वाहनासह ताब्यात घेण्यात आले. सदरील कारवाअ

नांदेड येथील स्थानिक गुन्हे शाखेने केली. सदर घटनेप्रकरणी लोहा पोलिसात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

नांदेड स्थागुशाचे सपोनि रविकुमार वाहुळे यांनी लोहा पोलिसात दिलेल्या फिर्यादीनुसार आरोपी विरुद्ध अंमली पदार्थ विक्री व वाहतूक प्रकरणी गुन्हा नोंदविण्यात आला असून आरोपीस मुद्देमालासह ताब्यात घेण्यात आले आहे.

## मॉर्निंग वॉकला जाणाऱ्या व्यक्तीवर चाकुहल्ला; मोबाईल, घड्याळ लुटले, शहराच्या भाग्यनगरमधील घटना

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरात लुटीच्या घटना वाढत असून भाग्यनगर कमानीच्या समोरून मॉर्निंग वॉकला जाणाऱ्या एकाला रस्त्यात अडवून अनोळखी तीन चोरट्यांनी पैशाची मागणी केली. पैसे देण्यास नकार दिल्यामुळे चोरट्यांनी त्यांच्या हातावर, पोटावर तीक्ष्ण हत्याराने वार करून मोबाईल व घड्याळ जबरीने चोरून नेले. सदरची घटना शनिवार दि. १४ जून रोजी पहाटे साडेचारच्या भाग्यनगर कमानीसमोर घडली.

भाग्यनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत पवार टी हाऊसच्या समोरून नेहमीप्रमाणे महेश जहागीरदार हे शनिवारी पहाटे ४.३० च्या सुमारास मॉर्निंग वॉकसाठी जात होते. त्यावेळी तीन अनोळखी चोरट्यांनी त्यांना रस्त्यात अडवून पैशाची मागणी केली. पैसे देण्यास नकार देताच चोरट्यांनी जहागीरदार यांच्या हातावर, पोटावर चाकूने वार केले. यात ते गंभीर जखमी होताच चोरट्यांनी हातातील मोबाईल व घड्याळ जबरदस्तीने चोरून पोबारा केला.

याप्रकरणी भाग्यनगर पोलीस ठाण्यामध्ये तिघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक रामदास शेंडगे यांना घटनेची माहिती मिळताच त्यांनी घटनास्थळी जाऊन चौकशी केली. सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे चोरट्यांना लवकरच जेरबंद केले जाईल असे सांगितले. मॉर्निंगवॉकला जाणाऱ्या नागरिकांत सदर घटनेमुळे भीतीचे वातावरण पसरले आहे. सदर घटनेचा छडा तात्काळ लावावा, अशी मागणी पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्याकडे करण्यात आली आहे.

## रस्ता सुरक्षा पथकांकडून रस्त्यावर धिंगाणा घालणाऱ्या मद्यपींवर कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी) –** शहरात रस्ता सुरक्षा पथकाद्वारे (सिटी स्ट्रिट सेफ्टी) सार्वजनिक ठिकाणी दारू पिऊन शांतता भंग करणारे व दारूचे साहित्य विक्री करणाऱ्या व्यक्तीविरुद्ध धडक कारवाई केली. शहरातील विविध पोलीस ठाणे अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी नांदेड शहरातील सार्वजनिक ठिकाणी घडणाऱ्या गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी स्थापन केलेल्या नांदेड सिटी स्ट्रिट सेफ्टी ड्राईव्ह अंतर्गत पथकाने अबिनाश कुमार, पोलीस अधीक्षक सुरज गुरव यांच्या सुचना व मार्गदर्शनाखाली पथक प्रमुख सपोनि भागवत नागरगोजे



व चार्ली पोलीस अंमलदार यांनी दि. १३ जून रोजी नांदेड शहरात सार्वजनिक ठिकाणी दारू पिऊन सार्वजनिक शांततेचा भंग करणारे व दारूचे साहित्य विक्री करणाऱ्या इसमांवर पुढीलप्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

पोलीस स्टेशन शिवाजीनगर सिटी स्ट्रिट सेफ्टी ड्राईव्ह पथकातील चार्ली क्रमांक एक, दोनमधील पोलीस अंमलदार यांना पेट्रोलींग दरम्यान इंडस्ट्रीयल एरियामध्ये २ इसम मद्यप्राशन करून सार्वजनिक शांततेचा भंग करीत असतांना मिळून आल्याने त्यांचेवर कलम ११०/११७ म. पो. कायदा प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे. हद्दीतील दारूचे दुकाने, वाईन शॉप, हॉटेल्स चेक करण्यात आले.

पोलीस स्टेशन भाग्यनगर सिटी स्ट्रिट सेफ्टी ड्राईव्ह पथकातील चार्ली क्रमांक एक व तीन मधील पोलीस अंमलदार यांना पेट्रोलींग दरम्यान अरूणोदयनगर, विकासनगर, वैशालीनगर, संभाजीनगर व नक्षत्र मंगल कार्यालय परिसरात ६ इसम मद्यप्राशन करून सार्वजनिक शांततेचा भंग करीत असतांना मिळून आल्याने त्यांचेवर कलम ११०/११७ म. पो. कायदा प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे. तसेच छत्रपती चौक येथे एक इसम अज्ञात वाहनांच्या अपघातात जखमी अवस्थेत पडलेला मिळुन आल्याने त्यास उपचारकामी दवाखान्यात रवाना केले. हद्दीतील दारूचे दुकाने, वाईन शॉप, हॉटेल्स चेक करण्यात आले.

## जिल्हा साहित्य संमेलनासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन

**किनवट (प्रतिनिधी) –** शासनाच्या निर्देशानुसार जिल्हा मराठी साहित्य संमेलनाच्या आयोजनासाठी शासनाकडे १५ जुलैपर्यंत प्रस्ताव पाठवावेत, असे आवाहन महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे सदस्य प्रा. डॉ. मार्तंड कुलकर्णी यांनी केले आहे.

यासंदर्भात अधिक माहिती देताना डॉ. कुलकर्णी म्हणाले की, मराठी साहित्याचा प्रचार, प्रसार व संवर्धन व्हावे यासाठी महाराष्ट्र शासन विविध स्तरावर प्रयत्न करीत आहे. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ व मराठी भाषा विभागाच्यावतीने हा प्रचार व प्रसार मोठ्या प्रमाणावर केला जातो. त्याचाच एक भाग म्हणजे जिल्हा साहित्य संमेलनाची योजना होय. चालू आर्थिक वर्षात अन्य मराठी साहित्य संमेलन योजनेत बदल करून दोन लाख रुपये अनुदानाऐवजी पाच लाख रुपये अनुदान करण्यात आलेले आहे.

३६ जिल्हे ३६ साहित्य संमेलनं अशी संकल्पना आहे. त्यासाठी १५ जून ते १५ जुलै या कालावधीत साहित्य संस्थांकडून अनुदानासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत. यानुषंगाने शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाकडून दि. १३ जून रोजी वर्तमानपत्रातून जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली आहे. इच्छुक साहित्य संस्थांनी वरील कालावधीत शासनाच्या नियमानुसार जिल्हा साहित्य संमेलन आयोजनासंदर्भात शासनाकडे प्रस्ताव पाठवावेत, असे आवाह डॉ. मार्तंड कुलकर्णी यांनी केले आहे.



**नांदेड –** लोहा तालुक्यातील डोणवाडा ते येळी घाट दरम्यान अवैध वाळू उपसा करण्यासाठी जाणारी महाकाय बोट लोहा तहसीलदार विठ्ठल परळीकर, मंडळ अधिकारी चंद्रकांत सहारे आणि तलाठी लक्ष्मण गोधने यांनी रस्त्यातच जप्त केली. ही बोट उस्माननगर पोलीस ठाण्यात जमा करण्यात आली असून, या बोट संदर्भात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती.

## स्वारातीम विद्यापीठ परिसरातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाची प्रवेशप्रक्रिया सुरू

**नांदेड (प्रतिनिधी)–** विद्यापीठ परिसरातील १३ संकुलांमध्ये पदव्युत्तर पदवीचे ४५ आणि पदवीचे १३ अभ्यासक्रम शिकविले जातात. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ परिसरातील १३ संकुलातील १३ पदवी आणि ४५ पदव्युत्तर पदवी, ०९ पदविका आणि ०८ प्रमाणपत्र अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठीचे वेळापत्रक विद्यापीठातर्फे जाहीर करण्यात आले आहे.

मंगळवार, दि.१७ जूनपर्यंत पदवी आणि दि. २३ जूनपर्यंत पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांना ई-समर्थ पोर्टलद्वारे प्रवेशासाठी नोंदणी करता येणार आहे. सीईटी आणि गुणवत्तेवर विविध अभ्यासक्रमास प्रवेश देण्यात येणार आहेत.

विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली प्रवेश समितीने वेळापत्रक तयार केलेले आहे. विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रवेश प्रक्रियेची संपूर्ण माहिती देण्यात आलेली आहे. दि. १७ जून पर्यंत पदवी आणि दि.२३ जून पर्यंत पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी नोंदणी करणात येणार आहे. पदवीची प्रथम गुणवत्ता यादी दि.१८ जून रोजी तर पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाची दि.२४ जून रोजी प्रकाशित होणार आहे. पदवी अभ्यासक्रमासाठी पात्र विद्यार्थ्यांना दि.२० जून तर पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना दि. २७ जूनपर्यंत आपले प्रवेश निश्चित करायचे आहेत. दि.२१ जून रोजी पदवीची तर पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाची दि.२८ जून रोजी दुसरी गुणवत्ता यादी प्रकाशित होणार आहे.

पदवी अभ्यासक्रमासाठी पात्र विद्यार्थ्यांना दि.२३ जून तर पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना दि. १ जुलैपर्यंत आपले प्रवेश निश्चित करायचे आहेत. दि.२४ जून रोजी पदवी आणि दि.०२ जुलै रोजी पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी स्पॉट प्रवेश प्रक्रिया पार पडणार आहे आणि दि.२५ जून रोजी पदवी तर दि. ३ जुलैपासून पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाची शिकवणी सुरु होणार आहे. विद्यापीठ परिसरातील संकुलामध्ये पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम पुढीलप्रमाणे आहेत. रसायनशास्त्रे संकुलामध्ये शिकविले जाणारे पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम एम.एस्सी. अनॅलॅटीकल केमिस्ट्री, इंडस्ट्रीयल केमिस्ट्री, मेडिसिनल केमिस्ट्री, ऑर्गनीक केमिस्ट्री, फिजिकल केमिस्ट्री आणि ॲनिमल केमिस्ट्री. वाणिज्य व व्यवस्थापनशास्त्रे संकुलामध्ये एम.कॉम., एम.बी.ए., संगणकशास्त्रे संकुलामध्ये एम.सी.ए., एम.एस्सी. कॅम्पुटर सायन्स, कॅम्पुटर अप्लिकेशन, डाटा सायन्स. भूशास्त्रे संकुलामध्ये एम.एस्सी. जिओलॉजी, इनव्हार्णमेंटल सायन्स, जिओग्राफी, जिओफिजिक्स, पी.जी. पदविका जिओइन्फोर्मेटीस. शिक्षणशास्त्रे संकुलामध्ये एम.एड., एम.पी.एड., ललित व प्रयोगजीवी कला संकुलामध्ये एम.ए. (थियटर आर्ट्स अँण्ड फिल्म), एम.ए. म्युझिक. भाषा, साहित्य आणि संस्कृती अभ्यास संकुलामध्ये एम.ए. इंग्रजी, मराठी, जैवतंत्रज्ञान संकुलामध्ये एम.एस्सी. बॉटनी, झुओलॉजी, मायक्रोबॉयलॉजी, बॉयोटेक्नॉलॉजी, पी.जी.डिप्लोमा इन मेडिकल लॅबॉरेटरी टेक्नोलॉजी. गणितीयशास्त्रे संकुलामध्ये एम.ए./एम. एस्सी. मॅथेमॅटीक्स, स्टॅटिस्टिक्स. माध्यमशास्त्र संकुलामध्ये एम.ए. मास कम्युनिकेशन अँण्ड जर्नालिझम, एम.ए./एम.एस्सी. इलेक्ट्रॉनिक्स मेडिया. औषधनिर्माणशास्त्र संकुलामध्ये एम.फार्म. (फार्मास्युटिकल केमिस्ट्री, फार्माकोलॉजी, फार्मास्युटिकल क्वालिटी ॲस्सुरंस). भौतिकशास्त्र संकुलामध्ये एम.एस्सी. फिजिक्स, एनर्जी स्टडीज्, सामाजिकशास्त्रे संकुलामध्ये एम.एस.डब्लू., एम.ए. सोसियोलॉजी, अप्लाईड इकॉनॉमिक्स, ह्युमन राईट्स, सायकॉलॉजी आदी पदव्युतर पदवीचे अभ्यासक्रम विद्यापीठ परिसरातील विविध संकुलामध्ये शिकविले जातात.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४
ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com